# पश्चिम घाट

गुजरातमधील तापी खोऱ्यापासून तामिळनाडूमधील कन्याकुमारीपर्यंत पसरलेला सह्याद्री, नीलगिरी व मलयरांगा यांनी बनलेला - (१४९० कि०मी० लांबी व सुमारे १.२९ लाख चौ० कि०मी० क्षेत्रफळ) पश्चिम घाट म्हणजे दक्षिण भारतातील पाण्याचे उगमस्थान! येथून गोदावरी, कृष्णा, तुंगभद्रा, कावेरीसारख्या पूर्ववाहिनी आणि वैतरणा, काळी, शरावती, पेरियार आदी पश्चिम वाहिनी नद्या उगम पावतात. या पर्वतश्रेणीवरील वनाच्छादनाने दक्षिण भारताचे जलचक्र नियंत्रित होते. भूतलावरचे हे जैवविविधतेचे नंदनवनच!

येथील सपुष्प वनस्पतींच्या ४००० जातींपैकी १४०० जाती केवळ पश्चिम घाटापुरत्या मर्यादित आहेत. (प्रदेशनिष्ठ) तेथील विविध जीवजातींची संख्या व त्यातील फक्त पश्चिम घाटवासींचे शेकडा प्रमाण पुढे दर्शविले आहे. (कंसात) शैवाल - ६८२ (२८), सदाहरित झाडे - ६४५ (५६), मुंग्या - ३५० (२०), सरपटणारे प्राणी - २२५ (६२), फुलपाखरे - ३३३ (११), मासे - २८८ (४१), उभयचर - १४६ (७९), सस्तन प्राणी - १५० (३८). याशिवाय खारफुटी, गवते, नेचे, आमर, कासवे, खेकडे, कीटक आदी वनस्पती - प्राण्यांच्या शेकडो जीवजाती तेथे असून अन्नसाखळीतून गुंतागुंतीचे परस्परावलंबन त्यामध्ये असल्याने या सर्व जीवजातींना संरक्षण देणे अगत्याचे आहे.

**<u>गाडगीळ समिती:</u>** पश्चिम घाट प्रदेशासाठी माहिती संग्रह बनवणे, त्याच्या आधारे संवेदनशील परिसर क्षेत्राच्या सीमा ठरवणे, त्याच्या व्यवस्थापनाची रूपरेषा आखणे यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण व वनखात्याने मार्च २०१०मध्ये डॉ० माधव गाडगीळ (अध्यक्ष), दहा तज्ज्ञ व चार शासकीय अधिकारी यांचा गट नेमला.

तज्ज्ञ गटाने अनेक ठिकाणांना प्रत्यक्ष भेटी दिल्या व तेथे खुली चर्चा आयोजित केली. उद्योगपती, खाणपती, बागायतदार, शेतकरी, मच्छिमार, विविध व्यावसायिक, अभ्यासक, तज्ज्ञ, शासकीय अधिकारी, पंचायती, जिल्हा परिषद सदस्य यांच्याशी संवाद साधला. आवश्यक ते मूलभूत संशोधन, विश्लेषण करून ३० ऑगस्ट २०११ रोजी मंत्रालयाला अहवाल सादर केला. दरम्यान या प्रश्नी लक्ष घातलेले पर्यावरण मंत्री जयराम रमेश यांचा खातेपालट झाला आणि सदर अहवाल गुलदस्त्यात ठेवण्याचे प्रयत्न शासनाने सुरू केले. परंतु माहिती अधिकाराखाली अनेकांनी अर्ज केले आणि अखेर केंद्रीय मुख्य माहिती आयुक्तांपर्यंत याबाबतचे अपील पोचून त्यांनी एप्रिल २०१२मध्ये सदर अहवाल महिन्याभरात जाहीर करावा असा आदेश दिला. त्या विरोधात पर्यावरण मंत्रालयाने दिल्लीच्या उच्च न्यायालयाकडे धाव घेतली. पण या न्यायपीठानेही हा अहवाल लोकांपुढे ठेवला पाहिजे असा आदेश दिला. अखेर तो अहवाल मे २०१२ या महिन्यात इंग्लिश भाषेमध्ये संकेतस्थळावर उपलब्ध करून सूचना मागवण्याचा सोपस्कार पुरा करण्यात आला. एकूणच त्या शिफारशी फेटाळण्याचा शासनाचा इरादा आहे. त्या शिफारशी जाणून घेऊन त्याबाबतच्या कार्यवाहीसाठी शासनावर जनआंदोलनेच दबाव आणू शकतात.

**<u>शासनाचा विरोध:</u>** गाडगीळ समितीच्या शिफारशी गुंडाळण्यास समर्थन देण्यासाठी केंद्र शासनाने डॉ० कस्तुरीरंगन् यांच्या अध्यक्षतेखाली समीक्षा गट नेमला आहे. पश्चिम घाट पर्यावरण रक्षण व संवर्धन याद्दष्टीने नेमलेल्या तज्ज्ञ गटाच्या अहवालास (यापुढे गाडगीळ समिती अहवाल असा उल्लेख) महाराष्ट्र राज्य शासनाचा कडाडून विरोध आहे. तेव्हा डॉ० कस्तुरीरंगन् यांच्यासमोर मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण मांडतात की, अहवालामुळे कोकणातील चारही जिल्हे बाधित होणार आहेत. शिफारशींची अंमलबजावणी झाल्यास या भागातील सर्व आर्थिक व्यवहार, विकासाची कामे ठप्प होणार आहेत. नवीन रस्ते, रेल्वे मार्ग, छोटे - मोठे औद्योगिक क्षेत्र, विमानतळ, बंदरांचा विकास, घरबांधणी, ऊर्जा प्रकल्प, जलसिंचन यावर विपरीत परिणाम होणार आहे. पर्यावरणाचे रक्षण आणि विकास यांचा समतोल साधणे आवश्यक आहे. कोकणची जनता व गाडगीळ समितीचे समतोल साधावा हेच म्हणणे आहे. परंतु येथे प्रश्न उपस्थित होतो की विकास म्हणजे काय आणि तो कोणासाठी? गेली पन्नास वर्षे कोकणचा विकास चालू आहे. कोकणचा निसर्ग सांभाळून विकास व्हावा अशी इच्छा असलेल्या कोकणच्या जनतेने कोणत्या विकास प्रकल्पांना विरोध केला, तर त्यामध्ये औष्णिक वीज प्रकल्प (कोळसा, गॅस व अणुभंजन आधारित), धातू, रासायनिक व अन्य प्रदूषणकारी कारखाने, पेट्रोकेमिकल कारखाने, पंचतारांकित पर्यटन, बॉक्साईट, लोह खाणी, औद्योगिक वसाहती, रेवस - मांडवा विमानतळ, मोठी धरणे (बाळगंगा) आदी प्रकल्प येतात. गाडगीळ समितीनेही अशा विनाशकारी प्रकल्पांबाबत बंदी वा कडक नियमन करणे अशा सूचना केल्या आहेत. परंतु विकासाच्या नावाने रोजगाराचे आमिष दाखवून पोलिसी दडपशाहीच्या जोरावर शासन हे प्रकल्प जनतेवर लादत आहे. आणि

गाडगीळ समितीच्या शिफारशींबाबत जनतेची दिशाभूल करत आहे. तेव्हा या शिफारशींचा प्रथम धावता आढावा घेऊ.

**गाडगीळ समितीच्या शिफारशी:** संपूर्ण पश्चिम घाटाचे क्षेत्र भारताच्या सुमारे चार टक्के आहे. पण एवढ्या परिसरामध्ये एकूण वनस्पती जगतातील २७ टक्के जाती आढळतात. एवढा हा प्रदेश जैवविविधतेने संपन्न आहे. हा संपूर्ण प्रदेश 'संवेदनशील परिसरक्षेत्र' म्हणून घोषित करून त्याचे संरक्षण करणे अगत्याचे आहे. अर्थात या प्रदेशाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये नैसर्गिक, सामाजिक, आर्थिक परिस्थिती विभिन्न आहे. तेव्हा सर्व प्रदेशात एकसुरी नियमावली न लावता, स्थलकालानुरूप व्यवस्थापनाची आखणी करण्याची शिफारस समितीने केली आहे. संबंध प्रदेशाची १) अतिसंवेदनशील २) मध्यम ३) कमी संवेदनशील अशी तीन टापूंमध्ये विभागणी केली आहे. ही विभागणी करताना उपग्रहाची उंचसखोलतेबाबतची माहिती, अभयारण्ये, सदाहरितअरण्ये, वनांचे प्रकार, प्रदेशनिष्ठ वनस्पती, मासे, पक्षी, पशू यांचे प्रमाण व अस्तित्वास धोका असलेले पशू, पक्षी यादृष्टीने महत्त्वाची स्थळे आदी माहितीचे संगणकीकरण करून विश्लेषण केले. त्यातून ६० टक्के प्रदेश अतिसंवेदनशील आणि १५ टक्के प्रदेश मध्यम आणि २५ टक्के कमी संवेदनशील अशी स्थूलमानाने विभागणी झाली. प्रत्यक्ष प्रदेशाच्या सीमा या पाणलोटक्षेत्र, गावाच्या सीमा आणि लोकांच्या गरजा लक्षात घेऊन गावकऱ्यांशी विचार विनिमयाने निश्चित कराव्या असे समितीने सुचविले आहे.

तज्ज्ञ गटाने सुचवलेले विविध निर्बंध हे मार्गदर्शक आहेत. काय नियम असावेत हे दिल्ली- मुंबईत ठिय्या देऊन बसलेल्या नेते- बाबूंनी ठरवावे, हे तज्ज्ञ गटाला मान्य नाही. संवेदनशील परिसर क्षेत्रे ही संकल्पना लोकाभिमुख पद्धतीने - पायाकडून कळसाकडे जात राबवली जावी असा समितीचा आग्रह आहे. कोणत्या टापूस अतिशय, मध्यम किंवा कमी संवेदनशील मानावे, तेथे काय निर्बंध लागू करावेत हे ठरवण्यात व नियमांच्या अंमलबजावणीवर अंकुश ठेवण्यात स्थानिक समाजांनी महत्त्वाची भूमिका बजवावी. जोडीला शास्त्रज्ञ, इतर तज्ज्ञ, शासकीय अधिकारी हेही आपल्या सूचना देतीलच. पण अग्रक्रमाने स्थानिक लोकांच्या इच्छा आकांक्षानुसार, व त्यांच्या देखरेखीखाली हे कार्यक्रम राबवावेत अशी तज्ज्ञ गटाची शिफारस आहे. म्हणून पश्चिम घाट परिसर तज्ज्ञ गटाच्या प्रतिपादनानुसार अशा व्यवस्थापनाबाबत ग्रामसभांचा, मोहल्ला सभांचा, ग्रामपंचायतींचा, पंचायत समित्यांचा, जिल्हा परिषदांचा, नगरपालिकांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. हे व्यवस्थापन सरसकट, काहीतरी ताठर निर्बंध लागू करून होणे अनिष्ट आहे, तेव्हा प्रत्येक ठिकाणी स्थानिक परिस्थितीला अनुरूप असेच निर्बंध, उपक्रम ठरवले गेले पाहिजेत. जमिनीचा वापर, मानवी वस्त्यांचे व्यवस्थापन, पाणी, शेती, मत्स्योत्पादन, सरकारी व खाजगी जमिनीवरील वन-व्यवस्थापन, जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन, खनिजांच्या खाणी, प्रदूषक उद्योग व औष्णिक वीज प्रकल्प, जलविद्युत, वाहतूक, पर्यटन, शिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञान आदी क्षेत्रांबाबत कसे व्यवस्थापन असावे याबाबतच्या शिफारशी अहवालात केल्या आहेत. त्यातील काही महत्त्वाच्या सूचना विचारात घेऊ.

**शेती:** सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन द्यावे. निश्चित कालावधी ठरवून त्या काळात सर्व रासायनिक कीटक व तणनाशकांचा उपयोग थांबवावा, रासायनिक खताचा वापर थांबवावा. (१. अतिसंवेदनशील प्रदेश - ५ वर्षे कालावधी. २. मध्यम - ८ वर्षे, ३. कमी संवेदनशील प्रदेश - १० वर्षे) जनुनिक परावर्तित पिकांवर बंदी घालावी. पिकांचे पारंपरिक वाण लागवडीत राखण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. ३० टक्क्यांपेक्षा तीव्र उतार असलेल्या जमिनीवर नांगरट टाळणाऱ्या फळबागा, वृक्षशेती लागवडीस प्रोत्साहन द्यावे.

**जमिनीचा वापर:** तिन्ही प्रदेशांमध्ये 'विशेष आर्थिक क्षेत्र' - सेझला परवानगी देऊ नये. 'हिल स्टेशन'ला परवानगी देऊ नये (याचा अर्थ लवासासारख्या हिल सिटीवर बंदी आणावी.) डोंगरमाथे, डोंगर उतार, वने, समुद्र किनारे आदी जनतेला खुल्या असलेल्या सार्वजनिक जमिनीवर खाजगी मालकी हक्कास मनाई. (याचा अर्थ आज पुण्याच्या आसमंतामध्ये कात्रज, मुळशी, पानशेत, वरसगाव, लोणावळा आदी ठिकाणी चाललेले खाजगी अतिक्रमण थोपवावे) सरोवर, पाण्याचे प्रवाह, देवराया, जैवविविधतेत समृद्ध प्रदेश, खास अधिवास, आदी विशेष क्षेत्रांवर कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होता कामा नये. जंगल जमिनीच्या वापरात बदलास मनाई. जंगल जमिनीवर युकॅलिप्टस आदी लागवड बंद, अशी लागवड असेल तेथे मूळच्या वनस्पतींची पुनःस्थापना, जंगल जमिनीवर तणनाशकांच्या वापरास मनाई, प्रदेशनिष्ठ वनस्पतींची लागवड करण्यास उत्तेजन, औषधी वनस्पतींच्या काढणीचे सक्त नियमन. शेतजमिनीवर वृक्ष लागवडविना अन्य बदलांना मनाई. प्रदेश १ व २मध्ये फक्त स्थानिक खेडेगावची वस्ती वाढल्यास त्यांच्या वस्तीसाठी आवश्यक तेवढी शेतजमीन वापरण्यास मुभा, रस्ते व इतर सुविधा पुरवताना त्यांची पर्यावरणीय किंमत आणि त्यांचा स्थानिक जनतेला होणारा फायदा याचा विचार आणि योजना यंत्रणेकडून तपासणी होणे आवश्यक आहे.

**<u>खनिजांच्या खाणी व उद्योग:</u>** १. खाणींना नवे परवाने देऊ नयेत. २. येत्या ५ वर्षात चालू खाणी बंद कराव्यात. ३. केवळ समतल भागात उपलब्ध नसलेल्या दुर्मिळ खनिजांसाठी परवाने द्यावेत. वननिवासी हक्क कायद्याखाली लोकांच्या पूर्वपरवानगीशिवाय खाणकाम परवाने देऊ नयेत. खाणकाम सक्त नियमनाखाली असावे. प्रदूषणयुक्त उद्योगांना मनाई, अस्तित्वात असलेल्या उद्योगांमध्ये २०१३ सालपर्यंत प्रदूषण शून्यापर्यंत उतरवले पाहिजे. स्थानिक मालावरील प्रक्रिया उद्योग नियमनाखाली ठेवून प्रदूषणविरहित असावे.

**<u>ऊर्जा:</u>** ऊर्जा निर्मितीची पर्यावरणीय किंमत व सामाजिक परिणाम याबाबत जागृती करून चैनचंगळबाजी वापर किमान करण्याचा प्रयत्न, ऊर्जा वापरात कार्यक्षमता वाढवण्याबाबत जागृती, विकेंद्रीत ऊर्जानिर्मितीस - सौरऊर्जा निर्मितीस उत्तेजन, कोळशावर आधारित नवीन वीजनिर्मिती प्रकल्पांना प्रदेश १ व २मध्ये मनाई, प्रदेश ३मध्ये प्रदूषण विरहित प्रकल्पास मुभा. मोठ्या पवनचक्की प्रकल्पास मनाई, नदी, ओढे यांचे प्रवाह बदलून जलविद्युत प्रकल्प उभारण्यास मनाई.

**<u>वाहतूक:</u>** प्रदेश १ व २मध्ये नवीन रेल्वे मार्ग आणि महामार्ग काढू नयेत.

**<u>जागतिक वारसा:</u>** भारत सरकारने आपणहून पश्चिम घाट प्रदेशास जागतिक महत्त्वाचा नैसर्गिक वारसा मानावा असा प्रस्ताव युनेस्को या संयुक्त राष्ट्रसंघाच्या संघटनेसमोर मांडला व अटीतटीचा प्रयत्न करून हा दर्जा मान्य करून घेतला ही मोठी स्वागतार्ह बाब आहे. हा ठराव मान्य करताना भारत शासन पश्चिम घाट परिसर तज्ज्ञ गटाच्या शिफारशी अंमलात आणेल अशीही अट युनेस्कोतर्फे घालण्यात आली आहे, हे ही आशादायक आहे. पण या प्रस्तावाचा तपशील काही चिंताजनक प्रश्न उपस्थित करतो. हा प्रस्ताव पश्चिम घाटातील ३९ स्थळांपुरता, म्हणजे या पर्वतश्रेणीच्या केवळ ५% भूप्रदेशापुरता मर्यादित आहे. म्हणजे एवढे क्षेत्र राखले की बाकीचे बिनधडक नासायचे असा ह्याचा अर्थ आहे काय? चुकीच्या विचारधारणेतून राखीव वने, अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, व्याघ्र प्रकल्प हाच भारतातल्या निसर्गरक्षणाचा एकमेव पाया मानला जातो आहे. त्यामुळे युनेस्कोच्या जागतिक वारसा प्रकल्पाचाही ही अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने हाच मुख्य आधार बनला आहे.

पश्चिम घाट परिसर तज्ज्ञ गटाचा आग्रह आहे की - १. वायु व जल कायद्यांसारख्या प्रदूषण नियंत्रणाबाबतच्या कायद्यांची अंमलबजावणी घट्टपणे करावी २. जैवविविधता व्यवस्थापन समित्यांना प्रदूषणावर नजर ठेवण्यासाठी सज्ज करावे ३. जेव्हा लोक पर्यावरणाच्या हानीविरुद्ध निषेध व्यक्त करण्यास उभे राहतात, तेव्हा त्यांचा निषेध दडपला जाऊ नये, उलट अशा गोष्टी निदर्शनास आणून देण्यास प्रोत्साहन दिले जावे

**<u>सदोष परीक्षण:</u>** पर्यावरणीय प्रभावाच्या परीक्षणाची (Environmental Impact Assessment: EIA) तरतूद ही पर्यावरणाच्या संरक्षणाच्या दृष्टीने फार महत्त्वाची आहे. ह्या परीक्षणाअंतर्गत पर्यावरणीय, सामाजिक व आर्थिक फ़ायदे-तोट्यांचा ताळमेळ पारखला जाईल, व फायद्याचे पारडे पुरेसे जड असलेले प्रकल्पच स्वीकारले जातील अशी अपेक्षा आहे. परंतु जवळजवळ सर्व ठिकाणी हे परीक्षण, व परीक्षण तयार केल्यानंतरची जनसुनावणी, शासकीय समित्यांतर्फे मंजुरी व प्रकल्प सुरू झाल्यावरचे पर्यावरणाचे व्यवस्थापन व त्यावरची देखभाल हे सगळेच अतिशय सदोष असल्याचे नजरेस येते. याचे प्रमुख कारण म्हणजे हे सर्व केवळ टाकणे टाकल्यासारखे, अप्रामाणिकपणे केले जाते. बहुतांश परीक्षणांत अतिशय महत्त्वाच्या गोष्टींकडे सोईस्कर रीत्या दुर्लक्ष केले जाते. उदाहरणार्थ, वीजवाहक तारांच्या जंजाळाचा पर्यावरणावर होणारा परिणाम. ऊर्जाउत्पत्ती वाढू लागली की ऊर्जावहनाकरता वीजवाहक तारा न्याव्या लागतात. त्यांचे मनोरे उभे करताना खालची जमीन व्यापली जाते; शिवाय तिथल्या बागायतीवर विपरीत परिणाम होऊ शकतो. अशा हानीकडे कानाडोळा करून कसे चालेल? ह्याही गोष्टी लोकच नजरेस आणून देत आहेत. आतापर्यंत पर्यावरणीय प्रभावाची परीक्षणे केवळ एकेक, सुट्या सुट्या प्रकल्पांना विचारात घेऊन केली जातात. पण कोणताच प्रकल्प असा अलिप्त नसतो.

**<u>तेव्हा पश्चिम घाट परिसर तज्ज्ञ गटाचा आग्रह आहे की:</u>** पर्यावरणसंबंधित मंजुरी देण्याच्या प्रक्रियेत पुढील मूलभूत सुधारणा कराव्यातः १. पर्यावरणावरील आघातांचे परीक्षण करण्याची जबाबदारी प्रकल्पाच्या प्रायोजकांकडून बिदागी मिळण्यावर अवलंबून नसणाऱ्या स्वतंत्र अशा तज्ज्ञ संस्थेकडे दिली जावी २. पर्यावरणावरील आघातांचे परीक्षण करण्यामध्ये स्थानिक जैवविविधता व्यवस्थापन समित्यांना सहभागी करणे सक्तीचे असावे ३. जनसुनावणीच्या वेळी पुढे आलेली सर्व माहिती व मांडलेल्या सर्व सूचना विचारात घेणे सक्तीचे असावे ४. पाच वर्षांसारख्या काही नियमित कालावधीनंतर पुन्हा एकदा पर्यावरणसंबंधित मंजुरी घेणे सक्तीचे असावे ५. पर्यावरणसंबंधित मंजुरी देताना घातलेल्या अटींचे पालन होत आहे अशी खात्री करून घेण्यामध्ये जैवविविधता व्यवस्थापन समित्यांना सहभागी करणे सक्तीचे असावे ६. सुट्या सुट्या पद्धतीने

नाही तर कोणत्याही एका प्रदेशातील वेगवेगळ्या प्रकल्पांतून व इतर हस्तक्षेपांतून होणाऱ्या पर्यावरणावरील संचित आघातांचे परीक्षण साकल्याने करणे सक्तीचे असावे.

**<u>पर्यावरण विषयक कायदे:</u>** १. २००२च्या जैवविविधता कायद्यानुसार सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांत स्थानिक निसर्गसंसाधनांच्या वापराचे नियमन करणे व संग्रहण शुल्क आकारणे ह्याचे अधिकार घट्टपणे दिलेल्या जैवविविधता व्यवस्थापन समित्या प्रस्थापित केल्या जाव्या. २. प्रादेशिक विकास योजनांची व्याप्ती वाढवून त्यामध्ये पर्यावरण संबंधित विषयांना समाविष्ट केले जावे व अशा नियोजनात जैवविविधता व्यवस्थापन समित्यांना सहभागी करणे सक्तीचे असावे. ३. जैवविविधता व्यवस्थापन समित्यांना प्रदूषणाची देखरेख करण्यात महत्त्वाची भूमिका द्यावी. ४. पिकांच्या संरक्षित जाती आणि शेतकऱ्यांच्या अधिकारांचे संरक्षण कायद्यानुसार गावरान वाणांची नोंदणी करण्यासाठी लोकांचे जैवविविधता नोंदणी रजिस्टरमधील माहिती हा महत्त्वाचा आधार मानावा. ५. २००६पासून राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरणाकडे एक भारतीय जैवविविधता माहिती प्रणाली निर्माण करण्याची योजना तयार आहे, त्यावर कारवाई सुरू करावी. ६. २००१च्या पिकांच्या वाणांचे संरक्षण व शेतकऱ्यांचे अधिकार कायद्यानुसार पारंपरिक वाणांची नोंदणी केली जावी व अशा वाणांचे लागवडीखाली जतन करण्यासाठी पंचायतींना अनुदान दिले जावे.

**<u>वनाधिकार कायदा:</u>** अनुसूचित जनजाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनांवरील अधिकारांना मान्यता) विधेयक २००६ ह्या कायद्याप्रमाणे सर्व आदिवासी समाजांना व वनप्रदेशात ७५ वर्षे किंवा अधिक काळापासून वस्ती असणाऱ्या इतर सर्व समाजांना जमीन कसण्याचे वैयक्तिक व सामूहिक वनसंपत्तीचे व्यवस्थापन व चिरस्थायी वापर करण्याचे सामुदायिक हक्क देण्यात आले आहेत. संपूर्ण पश्चिम घाट प्रदेशात १९३१च्या पूर्वीपासूनही ज्यांची वस्ती आहे असे अनेक पारंपरिक वननिवासी आहेत, तेव्हा हा कायदा ह्या सर्व प्रदेशाच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. कायद्याने अधिकार प्रदान केलेल्या सामूहिक वनसंपत्तीत राखीव जंगल, अभयारण्य किंवा राष्ट्रीय उद्यानातील प्रदेशाचाही समावेश होऊ शकतो. तेव्हा स्थानिक जैवविविधता समित्यांचे अधिकार क्षेत्र हे सामूहिक वनसंपत्तीवर चालेल हे उघड आहे. या दोन्ही कायद्यांची आणि आदिवासी स्वयंशासन कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जावी. पर्यावरणाचे संरक्षण करण्याचे सारे कायदे, लोकांना शासनात सहभागी करण्याचे सगळे कायदे खुंटीला टांगले गेले आहेत. तेव्हा आज खरी गरज आहे, हे सगळे कायदे जारी करण्याची. कायदेपालन चोख केल्यास. गाडगीळ समितीच्या अहवालातील बहुतेक शिफारशी प्रत्यक्षात उतरतीलच.

**<u>विनाशकारी विकास प्रकल्पांवरील मनाईचे परिणाम:</u>** गाडगीळ समितीने केलेल्या शिफारशी स्वीकारल्या तर रासायनिक शेतीवर बंधने आल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होईल; कारखाने, पंचतारांकित पर्यटन, खाणी, जंगलतोड यावर बंदी घातल्याने रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार नाहीत व तरुण पिढीपुढे बेरोजगारीचा प्रश्न उभा राहील; वीजनिर्मितीकेंद्रे उभारली नाहीत तर विजेचा तुटवडा वाढत जाईल असे आक्षेप घेतले जात आहेत. तेव्हा हे विसरले जाते की प्रचलित विनाशकारी विकासपद्धती नाकारणे याचा अर्थ विकास बंद करायचा असा नाही. तर पर्यावरणस्नेही, लोककेंद्री असा विकासाचा मार्ग स्वीकारायचा, ज्यातून अनेक नव्या रोजगारसंधी उपलब्ध होतील. शेती सेंद्रिय पद्धतीने केल्याने ती अर्थक्षम होईल. वृक्षसंवर्धनामुळे धूपनियंत्रण, पूरनियंत्रण, पाण्याची उपलब्धता वाढ साधेल. विविध वनोत्पादनांमुळे उद्योग-व्यवसायात वाढ शक्य होईल.

**<u>विनाशकारी प्रकल्पातून नक्त रोजगार घट:</u>** संवेदनशील क्षेत्र जाहीर केले तरी तेथील रहिवाशांच्या ज्या गरजा असतील त्याला काही बाधा येणार नाही. रस्ते, पाणी पुरवठा, वीज, घरबांधणी, प्रक्रिया उद्योग, कुटिरोद्योग आदी उद्योगधंदे स्थानिक लोकांच्या निर्णयानुसार चालू ठेवता येतील. परंतु बाहेरून येणारे भांडवलप्रधान व प्रदूषणकारी खाणी, आण्विक व औष्णिक वीज केंद्रे, बंदरे, पंचतारांकित पर्यटन - क्रीडा, विमानतळ, महामार्ग यावर बंदी येईल. हे उद्योग एवढे भांडवलप्रचुर आहेत की ९२०० कोटी रुपये गुंतवणुकीच्या एनरॉन वीज प्रकल्पात फक्त ३०० लोकांना नोकऱ्या, २,००,००० कोटी रुपये गुंतवणुकीच्या जैतापूर आण्विक ऊर्जा प्रकल्पात फक्त ७०० लोकांना नोकऱ्या अपेक्षित आहेत, आणि त्याही उच्चशिक्षित, तंत्रकुशल लोकांना. त्यामुळे वीजप्रकल्प, रिफायनरी, रासायनिक उद्योग कोकणात उभे राहिले तर कोकणच्या माणसाला झाडूवाला, रखवालदार, माळी अशी थोडीच कामे मिळू शकतील. या उद्योगांचा कच्चा माल बाहेरून येतो व तयार मालाची बाजारपेठ बाहेरच असते. थोडक्यात स्थानिक अर्थव्यवस्थेशी त्यांचे दुवे सांधलेले नसल्याने आर्थिक वाढीला उत्तेजन मिळत नाही. नोकरदार लोकांची संख्या अल्प असल्याने व्यापारउदीम व घरकाम आदी नोकऱ्यांमध्येही मर्यादितच वाढ होते. परंतु या मोठ्या उद्योगांची जमिनीची भूक मोठी असल्याने जमीन संपादनामुळे शेकडो शेतकऱ्यांची निर्वाहसाधने हिसकावून घेतली जातात. शिवाय हवा आणि पाणी प्रदूषणामुळे पिकांचे, मच्छिमारीचे नुकसान होते ते वेगळेच! तेव्हा बाहेरून लादलेले उपरे भांडवलप्रधान

उद्योग कोकणच्या विकासाला पोषक तर नव्हेत पण नक्त रोजगार मारकच ठरत आहेत. शिवाय यामुळे नैसर्गिक संपत्तीचा विध्वंस केला जात असल्याने कायमचे मोठे नुकसान होते.

**<u>पर्यावरण पूरक विकासातून रोजगार वाढ:</u>** कोकणची वैशिष्ट्यपूर्ण संपत्ती - डोंगर, जंगले, जमीन, नदी, शेती, फळबागा, मच्छिमारी - सांभाळून आणि त्यांचा शाश्वत पद्धतीने विकास करून, त्याआधारे विविध प्रक्रिया उद्योग व अन्य उद्योग सुरू केले तर रोजगारामध्ये आणि स्थानिक उत्पादन व उत्पन्नामध्ये मोठी वाढ होईल. विकासासाठी विविध योजनांद्वारा निधी उपलब्ध आहे. पश्चिम घाट विकास, फलोद्यान विकास, मच्छिमारी विकास, आदर्श गाव, रोजगार हमी योजना, शिवाय नाबार्ड व विविध बँकांच्या योजना. या सुट्टयासुट्टया व मुख्यतः व्यक्तिगत पातळीवर राबवल्या जातात. परिणामी मोठा निधी खर्ची पडूनही पुरेसा लाभ होत नाही. शिवाय जंगलतोड, खाणी, प्रदूषणकारी उद्योग आदींमुळे मोठे नुकसान होत असल्याने, विकास निधी वाया जातो. तेव्हा विनाशकारी विकास प्रकल्प रद्द करून, पर्यावरणस्नेही विकासासाठी एकात्मिक नियोजन केले तर उत्पादन वाढ व रोजगार वाढ साधता येईल.

**<u>रासायनिक शेतीस बंदी का?:</u>** आज देशभरच्या शेतीस रासायनिक खते व कीटकनाशके पायाभूत बनली आहेत. त्यामुळे विविध समस्या निर्माण झाल्या आहेत. १९७०नंतर सुधारित, संकरित बियाणे, रासायनिक खते आणि रासायनिक कीटकनाशके यांच्या वापराचा शासनाने जोरदार प्रचार केल्याने रासायनिक शेती वेगाने वाढत गेली व पारंपरिक बियाणे आणि खते यांचा वापर कमी होत गेला. रासायनिक खते व कीटकनाशकांच्या माऱ्यामुळे कसदार, सजीव मातीचा ऱ्हास होऊ लागला. जमिनीत असलेले कोट्यवधी सूक्ष्म जीवाणू जमीन भुसभुशीत ठेवतात. त्यामुळे पाणी, हवा व अन्नद्रव्यांचे चलनवलन चांगले होते व पिकाचे उत्तम पोषण होते. पीक कसदार आणि रसरशीत असले की किडींचा उपद्रव कमी होतो. स्थानिक हवामान, पाऊस, जमिनीचा मगदूर इत्यादी स्थितीत टिकाव धरतील, जोमाने वाढतील, असेच वाण अनुभवाने निवडले गेले होते व परंपरेने वापरात होते. मातीतील सूक्ष्म जीवाणू पिकाचा उतारा वाढण्यास मदत करीत. गांडूळ जमीन भुसभुशीत करीत व विष्ठेचे खत पुरवत. मधमाशा, फुलपाखरे पराग सिंचन करून पीक वाढवायला मदत करीत. रासायनिक खते व कीटकनाशके यांच्या माऱ्याखाली जीवाणूंची संख्या कमी झाली, गांडुळे नाहीशी झाली, मित्र-कीटक, मधमाशा, फुलपाखरे, पक्षी कमी झाले. जमीन कडक झाली, जमिनीची गुणवत्ता घसरल्याने उत्पादन कमी झाले. कीटकांमध्ये प्रतिरोध निर्माण झाल्याने फवारणीचा मारा वाढू लागला. त्यामुळे लागवडीचा नगदी खर्च वाढू लागला. हरितक्रांती तंत्रामध्ये संकरित बियाणांच्या पीक पोषणासाठी रासायनिक खतांची जोड आली. रासायनिक खते निचऱ्यावाटे वाहून पाणी दूषित झाले. खतांचे काही प्रमाणात स्थिरीकरण होते, त्यामुळे जमिनीचा पोत बिघडला. जमीन ही एक जैविक व्यवस्था आहे, ती ढासळली. रासायनिक खतांमुळे तणांचे पोषणही चांगले होऊ लागून रासायनिक तणनाशकांचा वापर सुरू झाला.

आज पर्याय निवडताना रासायनिक शेतीमुळे व पाण्याच्या भरमसाठ व अशास्त्रीय वापरामुळे जे प्रश्न निर्माण झाले आहेत त्यातून बाहेर पडून भारतीय शेती शाश्वत पायावर कशी उभी करता येईल याचा विचार करणे महत्त्वाचे होय. त्या दृष्टीने पारंपरिक भारतीय शेतीपद्धतीला आधुनिक शास्त्रातील ज्ञानाची जोड देऊन विकसित केलेला जैविक मशागतीचा पर्याय उचित दिसतो.

**<u>सेंद्रिय शेती किफायतशीर का बनते:</u>** जैविक मशागतीचे तीन घटक म्हणजे सेंद्रिय आच्छादन व खते यांचा वापर, मिश्र पीक पद्धती आणि वनस्पतीजन्य कीड नियंत्रण. कोणते ना कोणते सेंद्रिय पदार्थ भूपृष्ठावर सतत कुजत असल्यास, सूक्ष्मजीवांचे चांगले पोषण होते. सेंद्रिय आच्छादनमाल बाहेरून आणणे परवडण्याजोगे नाही. त्यासाठी तो जागेवरच निर्माण करण्याची योजना आखणे गरजेचे होय. पीक फेरपालट करून आधीच्या पिकाचे धसकट जागेवरच वापरणे, एका सरीत हिरवळीचे खत घेणे इ० मार्गे ते शक्य होते. हिरवळीचे खत देण्यासाठी ताग, बोरू, धेंचा, चवळी, मूग, गवार, उडीद, इ० पिके शेतात वाढवून फुलोऱ्यापूर्वी जमिनीत गाडणे; शेतबांधावर, पडीक जमिनीवर गिरीपुष्प, शेवरी इ० झाडे वाढवून कोवळ्या फांद्या, पाला शेतात आणून जमिनीत गाडणे; पिकाची उगवण झाल्याझाल्या वखरणी करून तण लोळवणे याचा आच्छादनासाठी उपयोग होतो व पोषक द्रव्येही मिळतात. हरितीकरण व गुरे-शेळ्यापालन याद्वारा सेंद्रिय मालाचा पुरवठा वाढून त्या आधारे गांडूळ खत, जैविक खत इ० घरीच बनवता येते. शिवाय माफक प्रमाणात शेण, गोमूत्र, इ० वापरून जीवाणूंच्या संख्येतील वाढीस उत्तेजक अशा जीवामृतांचा वापरही करता येतो. जमिनीतील जीवाणूंद्वारा पिकांना हवी ती, हव्या त्या प्रमाणात व हव्या त्यावेळी पोषणद्रव्ये मिळू शकतील. जीवाणूंची जोपासना हे पीक पोषणासाठी पायाभूत होय.

हरितक्रांती तंत्रामुळे एकच पिकाची लागवड रूढ होऊन मिश्र पिकांची पारंपरिक पद्धत जवळपास नाहीशी झाल्याने जमिनीतील अन्नघटकांमध्ये साधले जात असलेले संतुलन नाहीसे होऊन जमिनीची प्रत घसरून

उत्पादकता कमी होऊ लागली. जमिनीचा मगदूर सुधारण्यासाठी, पीक आराखडा ठरवताना एकच एक पीक न घेता मिश्र पीक पद्धती, पिकात फेरपालट (बिवड) पद्धती उपयुक्त ठरते. भात हे कोकणचे मुख्य पीक. पीक काढण्याआगोदर मूग/उदीड पेरल्यास उपलब्ध ओलाव्यावर ती वाढतात. शेंगा तोडून उर्वरित झाडे जागीच गाडल्यास जमिनीतील पोषकद्रव्ये वाढतात. भातावर भात न घेता भुईमूग, सूर्यफुल, घेवडा, वाल, पावटा, चवळी, कुळीथ घेतल्यावरही नवशोधक पिके उत्पादकता वाढतात.

सेंद्रिय मशागत पद्धतीने जमिनीचा कस सुधारला, देशी बियाणे वापरली म्हणजेच पीक स्थानिक परिस्थिती अनुरूप असले आणि वाढ सुदृढ झाली तर किडी व रोगाचा फारसा उपद्रव होत नाही. तरीही रोग आल्यास त्यांच्यावर वनस्पतीजन्य औषधे वापरता येतात. तसेच मित्र कीटकांची खास जोपासना करून घातक किडीवर नियंत्रण ठेवता येते. रासायनिक कीटकनाशकाचा एक दुष्परिणाम, विविध किडी खाणारे पक्षी व परभक्षी किडे हे पिकाकडे येत नाहीत आणि घातक किडींचा उपद्रव वाढतो. तसेच कीटकनाशकाने परागीकरण करणाऱ्या मधमाश्यांना बाधा होते. रासायनिक कीटकनाशकाचा वापर बंद केल्यास मधमाशा मुक्तपणे वावरू शकतात व नैसर्गिक कीड निवारण यंत्रणा वापरून घातक किडीचा चांगला बंदोबस्त करता येतो. रासायनिक शेती बंद करून सेंद्रिय शेतीचा पद्धतशीरपणे अवलंब केला तर सकस, आरोग्यदायी व चांगले उत्पादन मिळते आणि नगदी खर्च कमी झाल्याने निव्वळ उत्पन्न वाढते असा अनुभव आहे.

**<u>वृक्ष संवर्धन:</u>** स्थानिक संसाधनाधारे नैसर्गिक परिसंस्था व पर्यावरण सांभाळून नियोजनबद्ध पद्धतीने विकास साधल्यास कोकणातील अनेक समस्या सुटू शकतील. पावसाचा कोकणावर वरदहस्त! त्यामुळे कोकणामध्ये विस्तीर्ण व संपन्न जंगले होती; पण ब्रिटिशांनी जंगलतोडीवरचे निर्बंध उठवले. जहाजबांधणी, रुळांखालील तुळया इत्यादीसाठी जंगलाची प्रचंड तोड केली. स्वातंत्र्योत्तर काळातही जंगलतोड चालूच आहे. जोवर दाट झाडी, झुडपे, वेलींचे गर्द आच्छादन होते तोवर पावसाचा मारा झाडाझुडपांवर होऊन पाणी संथ गतीने जमिनीवर उतरे व पालापाचोळ्याच्या आच्छादनात साठून राहून झाडांच्या मुळांनी निर्माण केलेल्या पोकळयांच्या आधारे हळूहळू जमिनीत मुरे. जमिनीतले पाण्याचे साठे वाढून झुळझुळ वाहणारे झरे व नदीचे पाणी वर्षभर टिकून राही. वृक्षाच्छादनामुळे जमिनीची फारशी धूप होत नसे. तेच डोंगर बोडखे झाल्याने पाणी वेगात वाहून जाऊन जमिनीची धूप प्रचंड वाढली व पाणी मुरणे जवळजवळ बंद होऊन डिसेंबरपासून पाण्याचे दुर्भिक्ष्य पडू लागले. तेव्हा ढासळलेले निसर्गसंतुलन सुधारण्यासाठी हरितीकरण करून पाण्याचा वेग कमी करणे व जमिनीची धूप नियंत्रित करणे अत्यावश्यक आहे. धुवांधार पावसामुळे पूर, धूप अशी जी हानी होते ती नियंत्रित करून पाणी जमिनीत मुरवून, पावसाळ्यानंतरची पाण्याची उपलब्धता वाढवण्यासाठी वृक्ष संवर्धनापासून प्रारंभ करणे गरजेचे आहे. गवत, झुडपे, झाडे यांचे आच्छादन वाढवून कमी खर्चात पाण्याचे नियंत्रण करणे शक्य आहे.

**<u>हरितीकरण:</u>** डोंगरउतारावर, शिवाराच्या सरहद्दीवर आणि नाल्याच्या कडेने बांबूंची रोपे लावून बांबूबेटे वाढवून चांगला अडसर निर्माण करता येतो. उतारावर स्टायलो हेमाटा या गवताचा किंवा तागाचा दाट पेरा आणि खालील बाजूस टेफ्रासिया कँडिडा किंवा करवंद या झुडपांचे बी लावल्यास थोडक्या काळात चांगले आच्छादन वाढते. डोंगर उतारावर समतल चर खणून मोह, करंज, भेंडी, उंडी, जंगली आंबा, चार, कोकम, शिसम, जांभूळ, खैर, हिरडा, बेहडा, आवळा, इ० वृक्ष व त्यासोबत शिकेकाई, चंद्रज्योत, अंबाडी, शतावरी यांची लागवड फायदेशीर होते. बांधबंदिस्ती कार्यक्रमात डोंगर उतारावरील नाल्यांवर अंतराअंतराने लाकूड-बांबूंच्या अडण्या वापरून दगडाचे लहान बंधारे बांधून पाण्याचा वेग कमी करता येईल. नाल्यांच्या बाजूने उतारावरून वाहणारे पाणी कंटूरवर चर खणून व डोंगरावरील सपाटीच्या भागात लहान तळी खोदून, ही तळी चराने जोडून पाण्याचा वेग कमी करता येईल. वाड्या-वाड्यांनी, गावा-गावांनी एकत्रित निर्णय घेऊन बांधबंदिस्ती व हरितीकरण योजना राबवली तर पाच वर्षात कोकणच्या पाण्याच्या किमान गरजा वाडीवाडीत भागू शकतील. रबी हंगामात घेवडा, भुईमूग, मोहरी, मिरची, टोमॅटो, काकडी, वांगी, भेंडी, पालेभाज्या, कलिंगड आदी पिके, परसबाग, फळबागा व घरगुती वापरासाठी वर्षभर पाणी मिळेल. बांबू व विविध वृक्ष, वेली, झुडपे, औषधी वनस्पतीं याआधारे अनेक उद्योग सुरू करून रोजगार वाढ साधता येईल.

**<u>मच्छिमारी:</u>** किनाऱ्यापासून नजीक ४० मीटर खोलपर्यंतच्या पट्टयात सर्वात अधिक मत्स्यसंपत्ती आढळते. कारण या उथळ भागात सूर्यप्रकाश मिळाल्याने वनस्पतीची वाढ चांगली होते. पारंपरिक मासेमारीचा दर हा पुनउत्पादनाहून कमी आणि माशांची अंडी, लहान पिल्ले यांना इजा न पोचता, थोडक्यात पर्यावरण समतोल सांभाळून चालत असे. खोल समुद्रात पारंपरिक मच्छिमार पोचत नाही. तेव्हा तेथील मत्स्यसंपत्ती मिळवण्यासाठी सरकारी उत्तेजनाने ट्रॉलरचा उपयोग व पर्ससेन जाळी यांचा वापर सुरू झाला. पर्ससेन जाळी संबंध मत्स्यसमूहाला वेढून लहान मासेही पकडतात. तर ट्रॉलर तळ खरवडून समुद्रातील माशांच्या वसाहत स्थानांना धक्का पोचवतात. अशा रीतीने माशांच्या पुनरुत्पादनाच्या चक्राला आणि त्यांच्या

वसाहत स्थानांना धक्का पोचून मत्स्यसंपत्ती धोक्यात येऊ लागली. याशिवाय खोल समुद्रात मासेमारी करण्यास परवाना असलेली जहाजे किनाऱ्याजवळ विपुल मत्स्यसंपत्ती असल्याने बेकायदेशीरित्या उथळ समुद्रातही मासेमारी करतात. मोठ्या जहाजांच्या प्रचंड जाळ्यात बरेच मासे अडकले जाऊन तसेच छोटे मासेही पकडले जाऊन त्यांचा विनाश होतो. त्यामुळे पारंपरिक मच्छीमारांचे उत्पादन घटू लागले. खाउजा धोरणाखाली सरकारने बहुराष्ट्रीय कंपन्यांना खोल समुद्रात मासेमारी करून जहाजावरच प्रक्रिया करून ती मत्स्यसंपत्ती परस्पर निर्यात करायला मुभा दिली आहे. याचा अर्थ मासेमारी व्यावसायिकांमार्फत जे मासे खेडोपाडी लोकांना विकले जात, त्याचा पुरवठा कमी होऊन लोकांचा मत्स्याहार-प्रथिनांचा एकमेव स्रोत पण धोक्यात येत आहे.

मत्स्यसंपत्तीला दुसरा मोठा धोका आहे प्रदूषणाचा. नदी, खाड्या, समुद्र यांच्या प्रदूषणात वाढ होत आहे. त्यामुळे समुद्रातील वनस्पती संपत्ती कमी होऊन मत्स्यसंपत्तीवर विपरित परिणाम होत आहे. तसेच खड्डे, दलदली प्रदेश भरण्यासाठी कचरा वापरला जातो. त्यामधील पाण्यात विरघळणाऱ्या रसायनामुळे ओढे, नाल्यातील प्रदूषण वाढत आहे. त्यामुळे मासे मरणे, त्यांचे पंख झडणे, पकडल्यावर लवकर सडणे असे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. असा विनाश थोपवण्यासाठी प्रदूषण वाढेल असे औष्णिक ऊर्जा प्रकल्प व उद्योग यांची कोकणमधील वाढ थांबवली पाहिजे आणि आहे त्या कारखान्यातील प्रदूषित पाणी व कचऱ्याची विल्हेवाट यावर कडक नियंत्रण घातले पाहिजे. जागरूक ग्रामसमितींना यामध्ये लक्ष घालावे लागेल. मत्स्यव्यवसाय सुधारण्यासाठी सहकारी सोसायट्यांची पुनर्रचना करून आवश्यक ती तांत्रिक मदत, दुरुस्ती सेवा व कर्जपुरवठा व्यवस्था बँकांमार्फत बळकट केली पाहिजे. मत्स्य व्यवसायामध्ये बहुराष्ट्रीय व बड्या भारतीय कंपन्यांना प्रवेश देता कामा नये. कोकणची मत्स्यसंपत्ती पारंपरिक मच्छिमार व्यावसायिकांसाठी राखून ठेवली पाहिजे, म्हणजे पुरेसा मासेपुरवठा होईल आणि जनतेला माशाचे कालवण मिळू शकेल.

**<u>मच्छिमारीसाठी बंदरविकास:</u>** कोकण किनाऱ्यावर ४९ लहान बंदरे आहेत. त्यामध्ये मत्स्य उद्योगासाठी आवश्यक सोयी व सुविधा सुस्थापितपणे विकसित केलेल्या नाहीत. रत्नागिरीतील मिरकरवाडा मच्छिमारी बंदर विकासाचे काम वर्षानुवर्षे रेंगाळले. खाड्यांतून व बंदरातून साचलेला गाळ हा बंदर विकासातला अडसर आहे. पण तो गाळ एकदा उपसून प्रश्न सुटणार नाही. कारण कोकणातल्या बोडक्या डोंगरावरून धुवाधार पाऊस कोसळतो व माती वाहून नद्या व खाड्या गाळाने भरत राहातात. कोकणचा बंदर विकास पर्यावरण संतुलनाच्या प्रश्नाशी निगडीत आहे. हरितीकरणाचा कार्यक्रम युद्ध पातळीवर राबवला तरच गाळ साचण्याचा वेग नियंत्रित करता येईल. ठाणे जिल्ह्यातील सातपाटी, रायगड जिल्ह्यातील रेवस, रत्नागिरी जिल्ह्यातील साखरीनाटे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड आदी बंदरांचा मच्छिमारी बंदरे म्हणून विकास करणे महत्त्वाचे आहे.

**<u>प्रक्रिया उद्योग:</u>** निसर्गसंपत्तीच्या विकासापाठोपाठ अनेकविध प्रक्रिया उद्योग व कसबी उद्योग उभे करता येतील. आंबा, काजू, नारळ, आमसूल, फणस, अननस ही फळे आणि दालचिनी, जायफळ, मिरे आदी मसाल्याची पिके, सर्पगंधा, निरगुडी, सतवीण, गुळ वेल, अडुळसा, बावडिंग, हिरडा आदी औषधी वनस्पती, शिकेकाई, मध, बांबू, मस्त्य संपत्ती आदी कच्च्या मालावर प्रक्रिया उद्योग उभारण्यास मोठा वाव आहे. त्यासाठी खादी ग्रामोद्योग, लघुउद्योग विभाग, स्वयंरोजगार योजना अशा अनेक व्यक्तिगत पातळीवरील मदत योजनाही आहेत. परंतु त्यामधून लहान उद्योगांचा प्रश्न सुटत नाही. कुटुंब पातळीवर हे उद्योग चालतात. त्यामुळे कच्चा माल नियमितपणे मिळवणे, खेळते भांडवल पुरेसे व वेळेवारी हाती असणे, तयार मालाला बाजारपेठ मिळवणे, माल पुरवठा व्यवस्था, पैशाची वसुली, प्रत्यक्ष उत्पादनातल्या अडचणी असे व्यवस्थापकीय, तांत्रिक, आर्थिक व्यवहार सांभाळणे अशक्य होते. परिणामी संस्थात्मक पाठबळाविना हे उद्योग खेडेपातळीवर तंत्रशिक्षित तरुण-तरुणींना स्वतंत्रपणे चालवणे जवळपास अशक्य होते. त्यातून आज जाहिरातबाजीमुळे बड्या कंपन्यांचा माल 'लोकप्रिय' बनला आहे. दुकानदारही चांगले कमिशन मिळते म्हणून तो माल विक्रीसाठी ठेवणे पसंत करतात. त्यामुळे लहान उद्योगांना मालविक्रीचा गंभीर प्रश्न भेडसावतो. वास्तविक पाहता विकेंद्रित पद्धतीने रोजच्या गरजेच्या अनेक वस्तूंचे उत्पादन शक्य आहे. त्यामुळे आवरण (पॅकिंग), वाहतूक, उर्जा बचत होईल आणि स्थानिक पातळीवर रोजगार मिळेल. परंतु त्यासाठी भक्कम संस्थात्मक आधार उभा करणे आवश्यक आहे. जिल्हा सहकारी बँक किंवा जिल्ह्यातील राष्ट्रीयीकृत 'लीड' बँक यांच्या पुढाकाराने 'ग्रामीण उद्योग विकास केंद्र' स्थापून लघुउद्योग विकासाची जबाबदारी घ्यायला हवी. या केंद्रामार्फत तांत्रिक व आर्थिक बाबींच्या अभ्यासाआधारे स्थानिक पातळीस अनुरूप उद्योग प्रकल्पांचे आराखडे तयार करून त्याबाबत मार्गदर्शन व सल्ला आणि कर्जपुरवठा व्यवस्था उभी केली पाहिजे. तयार मालाला ग्राहक बांधून घेऊन निश्चित बाजारपेठ मिळवली पाहिजे. सरकार हे एक मोठे गिऱ्हाईक आहे. सरकारने आपली खरेदी ग्रामीण उद्योग विकास केंद्रांद्वारा करण्याचा निर्णय घेऊन आपली मागणी नोंदवली व बिले वेळेवर भरली तर मोठी व खात्रीशीर बाजारपेठ मिळेल. शिवाय ग्राहक भांडारे, कर्मचारी सोसायट्या, वसतीगृहे

इत्यादी ठोक गिऱ्हाईके बांधून घेणे शक्य आहे. आंबा, सुपारी, नारळ, मासे यांच्या विक्रीसाठी शेतकरी व मच्छिमार व्यापाऱ्यांवर अवलंबून असल्यास त्यांना भाव कमी मिळतो. व्यक्तिगत पातळीवर शेतकऱ्यांना व्यापार-प्रक्रियाउद्योग ही जबाबदारी पेलवणे कठीण जाते. तेव्हा शेतकरी, मच्छिमार यांच्या सहकारी सोसायट्यांमार्फत ही जबाबदारी घेणे शक्य आहे. या सहकारी सोसायट्यांनी शहरातील कामगार, कर्मचारी, शिक्षक आदींच्या ग्राहक-पत सहकारी संघटनांशी संपर्क साधून बांधील ग्राहक मिळवण्याची व्यवस्था केली तर ग्राहकांना खात्रीशीर माल व शेतकऱ्यांना स्थिर व किफायतशीर भाव मिळू शकेल.

**<u>समुचित लोक संघटन:</u>** कोकणच्या नैसर्गिक अनुकूलतेमुळे निसर्ग संवर्धन - संरक्षणाद्वाराच कोकणचा सर्वोत्तम विकास साधता येईल. त्यासाठी व्यापारी लूट व औष्णिक विद्युत प्रकल्प आणि औद्योगिक अतिक्रमणे थोपवणे ही पहिली पायरी. सामूहिक, शास्त्रीय नियोजनामार्फत सागरी व वनसंपत्तीची पुनर्स्थापना ही दुसरी पायरी. या संपत्तीचा चिरस्थायी पद्धतीने वापर करून त्याच्या आधारे कोकणच्या शेतकरी, मच्छिमार, कारागीर-सर्व श्रमिकांना अर्थपूर्ण काम आणि चांगले जीवनमान मिळवणे ही तिसरी पायरी. पण यासाठी संघटनेचा भक्कम आधार उभा करणे अगत्याचे आहे. तरच मच्छिमार, शेतकरी यांची आज होणारी लूट थांबविता येईल. उत्पादकांच्या सहकारी संस्थाच शास्त्रीय नियोजन आणि त्याची अंमलबजावणी करू शकतील. त्यासाठी कज्जे, कोर्टबाजी, अंधश्रद्धा, चाकरमानी वृत्ती यास मुरड घालून योजकत्व, शास्त्रीय दृष्टी, स्वावलंबन, संघटन कौशल्य, सहकार्य याची कास धरणे अगत्याचे आहे. गावपातळीवर ग्राम समितीमार्फत ग्रामविकासाचा एकात्मिक आराखडा सामूहिक सहभागाने तयार केला पाहिजे. जमीन व पाणी यांचे एकत्रित नियोजन, हरितीकरण व वनीकरण, फलोद्यान विकास, तळी/बंधारे यांची देखभाल, शेती सुधारणा, गवत व चारा व्यवस्थापन, जंगल संरक्षण अशा प्रत्येक कामासाठी ग्रामसमितीने विविध कार्यकारी समिती नेमून त्यांमार्फत सर्व योजना राबवल्या पाहिजेत. प्रत्यक्ष शेती व वाडीव्यवस्था कुटुंबपातळीवर असली तरी समाईक निसर्ग संपत्तीचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने सामूहिक पातळीवरील नियोजनाला कळीचे महत्त्व आहे. मोकाट चराई बंदी, बंधाऱ्यांची दुरुस्ती-देखभाल, समन्यायी पाणीवाटप हे सर्व निर्णय गावपातळीवर एकत्रित होणे अगत्याचे आहे. प्रक्रिया व इतर उद्योगांचे संघटन आणि गावातील मत्स्य, शेती व वन उत्पादने आणि औद्योगिक उत्पादने यांची खात्रीशीर व किफायतशीर विक्री यासाठी नागर ग्राहक-संस्थांशी परस्परपूरक संबंध प्रस्थापित करणे आवश्यक आहे. कोकणातील तरुण वर्गाने यासाठी लागणारे कसब, तंत्र कौशल्य व संघटनकौशलय मिळवून पुढाकार घेणे महत्त्वाचे आहे. मुंबईला असलेली कोकण ग्रामविकास मंडळे मुख्यतः देवळे, शाळा, रस्ते इ० विकासाची कामे हाती घेतात. त्यांनी हरितीकरण, कृषी-प्रक्रिया उद्योग व विक्री-व्यवस्था यासाठी मदत केली तर कोकणच्या खेड्यांचा कायापालट साधता येईल आणि पोटासाठी कोकण सोडण्याची वेळ तरुण-तरुणींवर येणार नाही.

यासाठी थोडी दूरदृष्टी ठेवून विकासाला सुयोग्य दिशा देण्याची जबाबदारी कोकणच्या तरुण-तरुणींनी घेणे आवश्यक आहे. आज झटपट पैसा कमावण्याचे विविध मार्ग तरुणांसमोर येत आहेत. कोकण रेल्वेमुळे जमीनीचे भाव एकदम वाढले आहेत आणि जमीन विक्री व्यवहारात मोठा पैसा दिसतो आहे. मोठ्या उद्योगांसाठी कंत्राटे, मध्यस्तगिरी यामध्ये व्यापारी, मध्यस्तांना मोठ्या फायद्याची संधी दिसते आहे. लगोलगचा व्यक्तिगत फायदा, न्यूनगंड, भयगंड यापोटी कोकणातील जमिनीची विक्री चालू आहे.

जमीन आज जरी बेताचे उत्पन्न देत असली तरी भविष्यातील उत्पादनक्षमता लक्षात घेऊन जमीन हाती राखणे गरजेचे आहे. लगोलग पैसा मिळवण्याच्या जाळ्यात न अडकता जमीन-आपला जीवनाधार सांभाळून ठेवणे महत्वाचे आहे. एकदा जमिनीची विक्री झाली तर कोकणची हिरवीगार भूमी उद्ध्वस्त करून उभे राहणारे कारखाने, औष्णिक वीजनिर्मिती केंद्रे आणि कोकणचे निळेशार समुद्रकिनारे ताब्यात घेणारी पंचतारांकित हॉटेल यांच्या सेवा-चाकरीत घरगडी, मोलकरीण, झाडूवाले व हमाल अशा व वेठबिगारीच्या कामात कोकणचा श्रमिक लोटला जाईल किंवा काळ्या धंद्यात गुरफटला जाईल. कोकणचे जनजीवन प्रदूषण, रोगराई, व्यसनाधीनता, लाचारी याने झपाटले जाईल. आपली भूमी व अस्मिता गमावण्याचा, दुय्यम नागरिक बनवले जाण्याचा धोका कोकणचा श्रमिक शेतकरी, मच्छिमार, कारागीर यांना जाणवतो आहे. आणि म्हणूनच शासकीय विकासाचा बुलडोझर अडवण्याचा प्रयत्न कोकणचा श्रमिक करतो आहे. स्वयंनिर्भर, स्वाभिमानी, समृद्ध जीवन उभे करण्यासाठी खऱ्या विकासाची मागणी घेऊन संघटित होतो आहे.

**<u>लोककेंद्री विकास:</u>** पर्यायी विकासनीतीमध्ये खाजगी नफा, भांडवल, पैसा हे केंद्रबिंदू न राहाता "माणूस" हा विकासाचा केंद्रबिंदू राहील. धनिकांच्या श्रीमंतीतील वाढ यावरून विकास मोजला जाणार नाही तर मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य आदी मूलभूत गरजा, अर्थपूर्ण कामाचा हक्क, मानवी प्रतिष्ठेला साजेल अशा रीतीने पूर्ण करणे हे विकासाचे उद्दिष्ट! देशाची निसर्गसंपत्ती व इतर साधनसंपत्ती समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी चिरस्थायी पद्धतीने वापरली जाईल, अशा पद्धतीने उत्पादनाचे नियोजन,

आणि मानवाला गुलाम बनवणारे उत्पादन तंत्र व व्यवस्थापन पद्धती बदलून मानवी सर्जनशीलता फुलवणारी, लोकांचा प्रत्यक्ष सहभाग व नियंत्रण असलेली सहकारावर आधारित विकेंद्रित उत्पादन व्यवस्था प्रस्थापित करण्याच्या दिशेने पावले उचलली जातील. मानवी जीवनातले 'माणूस'पण वाढावे हे विकासाचे ध्येय साधण्यासाठी भौतिक गरजा तर भागल्या पाहिजेतच, पण त्याबरोबर सहकार्य, सुसंवाद व समानता आधारित सामाजिक संबंध, मानवी सभ्यता समृद्ध करणारा सांस्कृतिक आविष्कार आणि लोकसहभागी शासनव्यवस्था उभी करणे हे पर्यायी विकासनीतीचे उद्दिष्ट!

**<u>विजेची गरज व वीज पुरवठा:</u>** कोकणमध्ये ९९०० मे०वॅ० क्षमतेच्या सहा महाकाय अणुभट्टया (जैतापूर) आणि २१००० मे०वॅ० क्षमतेचे कोळसा आधारित वीज प्रकल्प उभारण्यास राज्य शासनाने परवानगी दिली आहे. विजेची वाढती गरज भागवण्यासाठी ते अत्यावश्यक आहेत असे त्याचे समर्थन शासन व अन्य "विकासवादी" करतात. भारनियमन चालू असल्याने हा युक्तिवाद चटकन पटतो. विशेषतः विदर्भातील आत्महत्याग्रस्त कलावतीचे नाव (राहूल गांधीने प्रसिध्दी झोतात आणलेली) घेऊन असे समर्थन केले जाते. पण कलावतीकडे वीज नाही कारण दारिद्र्यामुळे तिला वीज परवडतच नाही. भारतातील सुमारे ३५% कुटुंबांकडे (७.५ कोटी) मुख्यतः गरिबीमुळे (कधी दुर्गम प्रदेशात असल्याने) वीज नाही. सर्व वंचित कुटुंबांना त्यांना परवडण्याजोग्या पद्धतीने वीज पोचवली तर ३ दिवे व १ टीव्हीसाठी प्रतिवर्षी ४००० मे०वॅ० क्षमतेची गरज असेल. कोणताही नवा प्रकल्प हाती न घेता केवळ कारखान्यातील मोटारी, रोहित्र आदींची कार्यक्षमता सुधारणा आवश्यक केली तर १२००० मे०वॅ० क्षमता उपलब्ध होऊ शकेल. तेव्हा वीज वंचिताना वीज पुरवण्यासाठी नवीन प्रकल्पाची अजिबातच गरज नाही.

विजेची रास्त गरज भागवण्याचे अनेक पर्याय भारतास उपलब्ध आहेत. सर्वात महत्वाचा व नव्या वीजनिर्मितीसाठी लागणाऱ्या भांडवली खर्चाच्या २० ते २५ टक्के खर्चात विजेची उपलब्धता वाढवण्याचा उत्तम मार्ग म्हणजे कार्यक्षमता वाढ. वीजनिर्मिती, पारेषण, वितरण आणि विजेचा वापर (दिवे, पंखे, उपकरणे, मोटरी, पंप, इ०) यातील सुधारणांद्वारा ३० ते ४० टक्के बचत साधता येईल. दुसरा महत्त्वाचा उपाय म्हणजे रोषणाई, जाहिरातबाजी, वातानुकूलन आदीद्वारा विजेची जी प्रचंड उधळपट्टी चालते त्यावर आळा घालण्यासाठी जादा वीज वापरासाठीच्या वीजदरामध्ये घसघशीत वाढ व वीज वापरावर कमाल मर्यादा लागू करणे. नवीन वीजनिर्मितीसाठी कोळशा आधारे, परंतु तो सरळ न जाळता वायूकरण करून वापरल्याने कार्यक्षमता वाढ साधता येते व प्रदूषण किमान होते. हे संयुक्त गॅस तंत्रज्ञान, नैसर्गिक गॅस, जलविद्युत, जैविक माल आदी स्रोतांमार्फत वीजनिर्मिती क्षमतेत लक्षणीय भर घालता येईल. शिवाय उद्याची ऊर्जा ही सौरऊर्जा हे लक्षात घेऊन त्यावरील संशोधन व वापर यावर भर देऊन २०३०नंतरच्या काळात तो महत्वाचा शाश्वत ऊर्जास्रोत बनेल. भारताजवळ ऊर्जेची भविष्यातील गरज भागवण्याच्या दृष्टीने असे अनेक अर्थक्षम, सुरक्षित, शाश्वत पर्याय उपलब्ध आहेत. प्रश्न आहे, शासनाला समुचित व जनहितकारी धोरण स्वीकारावयास लावण्याचा!

**<u>प्रस्तावित वीजनिर्मिती प्रकल्प:</u>** आखिल भारतीय पातळीवर अतिविघातक अणुभट्टया उभारून ६३००० मे०वॅ० आणि ईशान्य भारतात अतिविनाशकारी जलविद्युत प्रकल्प उभारून ५४००० मे०वॅ० वीजनिर्मिती क्षमता उभारण्याचा केंद्रीय शासनाचा विचार आहे. १.९२ लाख मे०वॅ० क्षमतेच्या कोळसा आधारित औष्णिक प्रकल्पांना परवानगी दिलेली आहे. ५ लाख मे०वॅ० क्षमतेचे प्रकल्प परवानगीच्या वाटेवर आहेत. एकूण ८ लाख मे०वॅ० क्षमतेची भर घालण्याच्या घोषणा आहेत. विजेचा अकार्यक्षम वापर व उधळपट्टी चालूच ठेवून आर्थिक वाढीचा वार्षिक दर ८-१०% असा उच्च पातळीवर राहील अशी गृहिते धरून योजना आयोगाने २०३० साली एकूण ८.३३ लाख मे०वॅ० क्षमता लागेल असा अवास्तव अंदाज बांधला आहे. आज भारतात १.८ लाख मे०वॅ० क्षमता आहे. सध्या उभारणी चालू असलेल्या कोळसा व गॅस आधारित वीजनिर्मिती प्रकल्पांद्वारे २ लाख मे०वॅ० क्षमता वाढ आणि जल, जैव, पवन, सूर्य आदीद्वारा ०.२ लाख अशी एकूण २.२ लाख + १.८ लाख मे०वॅ० अस्तित्वात असलेली मिळून ४ लाख मे०वॅ० क्षमता २०३०पर्यंत उपलब्ध व्हावी. जागतिक ऊर्जा परिषदेच्या अंदाजानुसार २०३० साली भारतात सुमारे ४ लाख मे०वॅ० क्षमता लागेल. तेव्हा विजेच्या तुटीचा बागुलबुवा उभा करून केंद्रीय शासन हजारो मे०वॅ० क्षमतेचे विनाशकारी प्रकल्प जनतेवर जुलुमजबरदस्तीने लादत आहे, ते रोखण्याची निकड आहे. कोकणामध्ये अणुभट्ट्या व कोळसा आधारित नवी वीज केंद्रे उभारण्याची अजिबात गरज नाही आहे.

**<u>अहवाल विरोध:</u>** "विकास विरोधी" अशी ओरड करत राज्य सरकारे, खाणचालक, उद्योजक आदींचा गाडगीळ समितीने सादर केलेल्या शिफारशींना विरोध होत आहे. उजवे राजकीय पक्ष व महाराष्ट्र राज्य सरकार अहवालातील शिफारशींबाबत दिशाभूल करून अहवाल विरोध चेतवत आहेत. केंद्र सरकार तर तो फेटाळण्याच्या मार्गावर आहे. शासकीय पातळीवर परिणामकारक नियमन - नियंत्रण होण्याचा संभव नाही.

कारण धनदांडगे, राज्यकर्ते, नोकरशहा व त्यांचे हजारो हस्तक, व्यापारी, सट्टेबाज या सर्वांचेच हितसंबंध 'विनाशकारी विकासात' गुंतलेले आहेत. हवामान, जलचक्र, जैवविविधता, पर्यावरणीय समतोल या सर्व दृष्टीने संरक्षण देणे अनिवार्य आहे अशा पश्चिम घाट प्रदेशास संरक्षण देण्यास शासन तयार नाही. अनेक विनाशकारी प्रकल्पांविरोधात - जैतापूर अणुवीज प्रकल्प, कोकणमधील औष्णिक ऊर्जा प्रकल्प, खाणी, केरळमधील अतिरापिल्ली जलविद्युत प्रकल्प, गोवा व कर्नाटकामधील खाणी - स्थानिक पातळीवर जनआंदोलने चालू आहेत. गाडगीळ समितीच्या ज्या शिफारशी आहेत तशाच मागण्या घेऊन पश्चिमघाट परिसरातील जनता आज लढत आहे. गेली वीस वर्षे कोकणच्या जनतेच्या याच मागण्या आहेत, हे १९९७ साली कोकणमधील जनसंघटनांनी कोकण संघर्ष यात्रा आयोजित केली होती, त्यामागील भूमिकेवरून स्पष्ट होते.

**<u>विनाशकारी प्रकल्प विरोधी संघर्ष यात्रा:</u>** वेळागर (ता. वेंगुर्ला), सातर्डे (ता. सावंतवाडी), कणकवली, ओणी (ता० राजापूर), निवळी (ता० रत्नागिरी), चिपळूण अशी दक्षिण यात्रा आणि चेंबूर, नेरे (ता० पनवेल), पाताळगंगा परिसर, पेण, रेवस-मांडवा, नागोठणे, लोटे (ता० खेड), मार्ग ताम्हाणे अशी उत्तर यात्रा, महाराष्ट्र मच्छिमार संघटना, मुंबई, वेळागर संघर्ष समिती, एन्रॉनविरोधी संघर्ष समिती, उषा-इस्पात विरोधी संघर्ष समिती, सातर्डे, एच०ओ०पी०सी०एल०विरोधी संघर्ष समिती, पाताळगंगा प्रदूषण विरोधी संघर्ष समिती, धरमतर खाडी बचाव कृती समिती, प्रदूषण व बेकारी हटाव कृती समिती आदी संघटनांनी २५ ते २८ मार्च १९९७ या दिवशी संघटित केली व २८ मार्चला गुहागरला एकत्रित समारोप केला. त्यावेळी कोकण संघर्ष समितीच्या पत्रकामध्ये मांडलेली कोकणवासियांची भूमिका फेरनजर टाकावी अशी समर्पक आहे.

“निसर्ग संपत्तीने संपन्न अशा कोकणाचा विनाश करणारी आणि कोकणी भूमिपुत्राला समूळ उखडून टाकू पाहणारी विनाशकारी विकास(?) प्रक्रिया कोकणात उभी केली जात आहे. देशाची आणि कोकणाची आर्थिक प्रगती त्या विकास पद्धतीमुळे होईल असा भ्रम शासनकर्ते, भांडवलदार, ठेकेदार आणि त्यांचे हितसंबंधित समर्थक उभा करीत आहेत. कोकणातील डोंगर, नद्या, खाड्या, सुपीक जांभ्या दगडाची जमीन, समुद्र, फळबागा, जंगले, शेती आणि त्या सर्वांच्या आधाराने ताठ मानेने जगणारा कोकणी माणूस-शेतकरी, कारागीर आणि मच्छिमार यांना संपवीत आपला धनसंचय करू इच्छिणारी अशी ही विकास पद्धती आहे. रासायनिक कारखाने, पर्यटनप्रणीत हॉटेल्स, मोटेल्स, फार्म हाऊस, अभयारण्ये यांच्यासहित बंदरांचे खाजगीकरण, शेतकऱ्यांच्या जमिनींची वारेमाप खरेदी, एम०आय०डी०सारखा सक्तीचा व लोकशाहीविरोधी कायदा लावून खाजगी कंपन्यांना दामदुप्पट नफा मिळवून देण्यासाठी केले जाणारे भूमिसंपादन, दिल्या जाणाऱ्या सोयी-सवलती हे सर्व त्यांच्या विकास पद्धतीत आहे. कोकणातील नद्या, खाड्या, समुद्र, जमीन, झाडे इ०चा वारेमाप दुरुपयोग करून हे नैसर्गिक स्रोत कायमचे संपविणे हे त्यांचे पहिले काम. त्या स्रोतांचे आधाराने आपली शेती, मच्छिमारी करणाऱ्या भूमिपुत्राला रस्त्यावर आणून निराधार करणे हे दुसरे काम आणि रोजगार, पंचतारांकित विकासाचे व देशहिताचे भ्रम निर्माण करून आपला धनसंचय करणे हा त्यांचा गर्भित हेतू आहे. त्यांचे समर्थन करीत आहेत स्वार्थी, लबाड, समाजहिताची जाणीव नसलेले मध्यस्थ व दलाल."

"त्या संपूर्ण विकास पद्धतीतून दहा टक्क्यांचे हित व ९० टक्क्यांचा विनाश होणार आहे हे उघड आहे. त्या अन्यायकारक पद्धतीला संपूर्ण कोकणातील गरीब पण जागरूक जनता प्रामाणिकपणे विरोध करीत आहे. भारतीय उपक्रमांना डावलून गुहागर पट्टयातील नैसर्गिक स्रोत व जीवनधारा संपवू पाहणाऱ्या, जगात भ्रष्ट म्हणून कुप्रसिद्ध असलेल्या, डॉलर्सच्या प्रमाणरूप किमतीत महागडी वीज भारतीयांच्या माथी मारू पाहणाऱ्या दाभोळ वीज कंपनी (एन्रॉन) विरोधात स्थानिक जनतेबरोबरच देशभरातील जागरूक लोकचळवळींनी संघर्ष पुकारला आहे. वेळागर येथे स्थानिकांच्या जमिनी जबरदस्तीने बळकावू पाहणाऱ्या धनदांडग्यांविरोधात सिंधुदुर्गीय जनता प्राणपणाने लढत आहे. मुंबई शहराचा विस्तार लादून स्थानिकांना बेघर करू पाहणाऱ्या मुंबई महानगर प्राधिकरण (बी०एम०आर०डी०) आराखड्याविरोधात पेण, पनवेल, अलिबागमधील जनता उभी ठाकली आहे. मत्स्यव्यवसाय व समुद्राच्या रक्षणासाठी किनारपट्टीचे मच्छिमार एकवटले आहेत. असे कित्येक लढे ठिकठिकाणी संघटित होत आहेत. ही कोकणी आणि भारतीय जनतेच्या लढ्याची नांदी आहे."

"संपूर्ण भारतावर अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्रांच्या साम्राज्यवादाचे अंकित झालेल्या, ८०% भारतीयांचे शोषण करू पाहणाऱ्या विकास पद्धतीचे सावट पसरले आहे. त्याविरुद्ध भारताच्या रक्षणासाठी प्राणपणाने लढून स्वातंत्र्याची उभारणी करणे आता आवश्यक झाले आहे. त्या विकास पद्धतीचा निर्धारित बळी ठरलेल्या कोकणामध्ये म्हणूनच लढ्यांची एकजूट आणि सामर्थ्य बांधणी गरजेची आहे. आमचा विकास कशात आहे हे ठरविण्याचा अधिकार आमचा आहे आणि तो आम्हाला माहीत आहे. कोकणातील निसर्गदत्त अशा जीवनधारांना टिकवीत निरंतर व चिरंजीवी विकासाची आमची परंपरा आहे व त्या पद्धतीनेच खऱ्या अर्थाने

कोकण अधिक समृद्ध होईल ही आमची भूमिका आहे. म्हणूनच विनाशकारी विकास पद्धतीला पराभूत करण्यासाठी, तिचा प्रमुख प्रतिनिधी 'एन्रॉन'ला हटविणे हे आपले पहिले लक्ष्य."

बहुराष्ट्रीय व बड्या भारतीय कंपन्या, त्यांच्याशी संगनमत करून भारी कमिशन उपटणारे राज्यकर्ते व अधिकारीवर्ग, बांधकाम साहित्य व मजूर - पुरवठा कंत्राटांतून मोठा नफा उठविणारे ठेकेदार व व्यापारी आणि त्यांचे आश्रित नोकरदार व पोलीस पलटणी विरुद्ध कोकणचे भूमिपुत्र शेतकरी, मच्छिमार, चांभार, सुतार, बुरूड आदी कारागीर स्त्री-पुरुष यांमध्ये १९९४पासून आजही अटीतटीची लढत चालू आहे. जनतेचा एवढा विरोध का हे या महाकाय विनाशकारी प्रकल्पांमुळे केवढे नुकसान होते याचा धावता आढावा घेतल्यास लक्षात येईल.

**<u>कोकण किनारपट्टीचे औद्योगिकीकरण व व्यापारीकरण विशेष घातक का?</u>**

आधुनिक बंदरे, वीजप्रकल्प, रिफायनरी, मोठे कारखाने, पंचतारांकित हॉटेले, झिंगेसंवर्धन प्रकल्प, पश्चिम किनारी सागरी महामार्ग, विमानतळ असे अनेकविध प्रकल्प कोकणच्या किनारपट्टी प्रदेशात उभे राहात आहेत. किनारपट्टीवरील बांधकामांमुळे पर्यावरणीय असमतोल व प्रदूषणवाढ होऊन दूरपल्ल्याचे गंभीर दुष्परिणाम संभवतात. म्हणून १९ फेब्रुवारी १९९१ रोजी केंद्र सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाने समुद्रभरतीच्या रेषेपासून ५०० मीटर अंतरापर्यंत बांधकाम व इतर हस्तक्षेप यांचे नियंत्रण करण्यासाठी एक अधिसूचना जारी केली. त्यातील निर्बंध वरील अनेक प्रकल्पांमुळे मोडले जाऊन घातक परिणाम संभवतात. त्याचे स्वरूप थोडक्यात पाहू.

**<u>बंदरविकास:</u>** बंदरविकास करताना खोल समुद्रात खणून व भर घालून धक्के उभे केलेले आहेत, केले जात आहेत. त्याचा दुष्परिणाम प्रवाळ व इतर समुद्रजीव आणि माशांच्या प्रजननच्या जागा यावर होतो आहे. मोठे टँकर्स, मालवाहू जहाजे व यांत्रिक मच्छिमारी जहाजे यांची वर्दळ वाढत आहे. परिणामी समुद्रात वाहून जाणारे तेल व वंगण याचे प्रमाण वाढत जाऊन माशांना श्वासोच्छवास करणे कठीण होते. धक्का बांधणीमुळे सागरातील प्रवाहांवर काय परिणाम होईल, सध्याचे वाळूचे बांध (sand bars) कसे हलतील, नवीन कोठे तयार होतील, पाण्याचा फुगवटा कोठे पसरेल या गोष्टींचा अभ्यास न करता खाजगी कंपन्यांचे धक्के बांधण्याचे काम चालू आहे व त्यामुळे गुंतागुंतीच्या समस्या उभ्या राहात आहेत.

**<u>कारखानदारी:</u>** किनारपट्टीनजीक पठारावर कारखाने व वसाहती उभ्या राहात आहेत. त्यासाठी संपूर्ण जंगलतोड व सपाटीकरण केले जाऊन पठारावरचा मातीचा थर वाहून जांभा दगड उघडा पडत आहे. या खडकात पाणी झपाट्याने मुरते व निचरून जाते. त्यामुळे अशा उघड्या पठारावर गवताशिवाय कोणतीही वनस्पती जगणे कठीण आहे. परिणामी कारखान्यांच्या वाढीमुळे समुद्र किनाऱ्यावरील हिरव्या पाचूच्या पठारांचे वाळवंटीकरण होत आहे.

कारखान्यातून बाहेर पडणारे पाणी व सांडपाणी ओढे, नद्यांत वाहून त्या प्रदूषित झाल्या आहेत. हे प्रदूषित पाणी खाड्यांमध्ये वाहत जाते. खाड्यांलगतची खारफुटीची जंगले व त्यालगतचे चिखलाचे पट्टे हे सागरी मासे व इतर जलचर यांच्या प्रजननाच्या जागा आहेत. खाड्यांमध्ये प्रदूषित पाणी शिरल्याने मासे व इतर सजीवांच्या प्रजननावर विपरित परिणाम होत आहे. दाभोळ आणि रत्नागिरीजवळील खाड्यांमध्ये असे दुष्परिणाम जाणवू लागले आहेत. सांडपाणी, मैलापाणी यातील अन्नांश व रसायने यामुळे पाण्यात विरघळलेल्या प्राणवायूचे प्रमाण कमी होऊन वनस्पती व माशांवर अनिष्ट परिणाम होत आहेत. कारखान्यातून बाहेर पडणारी गरम हवा व दूषित वायू, आम्ल पाऊस यांचा दुष्परिणाम आंबा, सुपारी, नारळ अशा मौल्यवान पिकांवर होऊन फळांचे उत्पन्न कमी होणे, फळे आतून सडणे यामुळे नुकसान होत आहे. कोकणची जमीन निचऱ्याची असल्याने सांडपाणी व कचरा यामुळे विहिरींचे पाणी दूषित होऊन खेडोपाडी रोगराई पसरत आहे.

**<u>जंगल तोड:</u>** कोकणची जंगले ही सदाहरित दुर्मिळ वृक्ष, वेली व वनस्पती यासाठी विख्यात होती. त्यामध्ये कित्येक औषधी वनस्पती, वेतासारखी अत्यंत उपयुक्त वनस्पती आढळतात. येथील वनस्पतीतील विपुल जैविक विविधता हा जनुकांचा अमूल्य ठेवा नवनवीन जाती विकसित करण्यासाठी पायाभूत आहे. जंगल तुटले आणि तेथील विविधता संपली की सदाहरित वृक्ष वाढत नाहीत. जंगलाचे छत नष्ट झाले की, तेथे खुरटी वाढ फक्त होते. तेथील कीटक, सरपटणारे प्राणी, पक्षी नाहीसे होऊ लागतात. कोकणची सदाहरित जंगले तुटल्याने ३५ पक्षीजाती नाहीशा झाल्याचे अभ्यासकांना आढळले आहे. जंगले तुटल्यामुळे डोंगरातले झरे व प्रवाह आटले आहेत व पाण्याचे दुर्भिक्ष वाढत आहे. त्यात भर पडते आहे नवीन कारखाने, वसाहती, हॉटेले यामुळे पाण्याच्या मागणीतील प्रचंड वाढीची. वीजनिर्मिती केंद्रे, हॉटेले, कारखाने पाणीपुरवठ्यासाठी

कूपनलिका, विहिरी खणून भू-जलाचा बेछूट उपसा करीत आहेत. हा वेग पुनर्भरणाच्या वेगाहून अधिक होऊन खारे पाणी भू-जलात शिरत आहे. परिणामी गावचा पाणीपुरवठा खारट होऊन गावकऱ्यांच्या हातचे पिण्याचे पाणीसुद्धा हिरावले जाते आहे.

किनारपट्टीवरील पुळणींचा वापर पंचतारांकित व्यापारी पर्यटनासाठी करण्यास उत्तेजन दिले जाते आहे. हॉटेले व इतर बांधकामांमुळे नैसर्गिक प्रवाहाला अडथळे निर्माण होत आहेत. किनारपट्टीवरील खारफुटी व इतर वृक्षसंपदा नष्ट केली जाते आहे. कचरा, टाकाऊ पदार्थ, सांडपाणी यामुळे खाड्या, समुद्रकिनारे प्रदूषित होत आहेत. मुंबई ते रेवदंडा, हरिहरेश्वर, गणपतीपुळे, मालवण येथे पर्यटनाचे विपरीत परिणाम जाणवू लागले आहेत. मोटारींसाठीच्या रस्त्यांच्या वाढीमुळेही किनारपट्टीचा विध्वंस होत आहे.

**खाणी:** लोह व बॉक्साईटच्या खाणींमुळे गंभीर समस्या उद्भवतात असा गोवा, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांमधील अनुभव आहे. या खाणी डोंगरीभाग, नारळी - पोफळी - आमराया आदींच्या परिसरामध्ये काढल्या जातात. खनिजाची वाहतूक ट्रकने चालते. त्यासाठी खाणीपर्यंत कच्चे रस्ते काढले जातात व मार्गातील वृक्षसंपदेवर कुऱ्हाड चालवली जाते. खाणीच्या आसमंतातील झाडे, बागा उध्वस्त केल्या जातात. खाणकाम सुरू झाले की वरील थर ("रिजेक्ट") हा टाकाऊ असल्याने तो इतस्ततः पसरून टाकला जातो. त्याने फळबागांचे, शेतीचे नुकसान होते. ओहळ, ओढे बुजतात. उत्खननामुळे धुळीचे लोट उठतात. तसेच कच्च्या रस्त्यावरून खनिजाच्या सततच्या ट्रक वाहतुकीमुळे लाल धुळीचे लोट पसरतात. आसमंतातील पोफळी, नारळ, आंबा, फणस, यांचा मोहेर, फुले यावर माती चिकटून फुले गळतात व उत्पादन घटते. झरे, पाट, ओढे, भातखाचरे यातील पाण्यात लाल धूळ मिसळते. ती तळाशी घट्ट चिकटून पाण्याचा झिरपा बंद होतो. त्यामुळे फळबागा, भातशेतीचे मोठे नुकसान होते. झिरपा थांबल्याने विहिरींचे पाणी आटते. पावसाळ्यात खाणीमध्ये पाणी साठते. ते मातीमिश्रित पाणी उपसून टाकल्याने झरे, ओढ्यांच्या पाण्यात मिसळून नुकसान होते.

खाड्यांच्या बाजूने मातीचे बंधारे घालून भातशेती - खाजन शेती चालते. ट्रकमधून खनिजाची वाहतूक करून खाडीच्या काठावर साठवून ती पडावामध्ये भरून समुद्रात नांगरलेल्या मोठ्या जहाजांकडे नेली जाते. पडावांच्या सततच्या वाहतुकींमुळे लाटा उसळतात. त्यामुळे मातीचे बंधारे तडकतात, फुटतात व खाजन शेती उध्वस्त होते. अशा रीतीने खाणींमुळे जमीन गमावणे, जमिनीची धूप, झरे, ओढे, नदीचे प्रदूषण, गावाचा पाणीपुरवठा प्रदूषित होणे, धुळीमुळे शेती, फळबागांचे मोठे नुकसान, खाणीवरील पडाव भरणा स्थानी (लोडिंग पॉइट) खारफुटी व इतर झाडाझुडपांची कटाई, त्यामुळे मत्स्योत्पादनावर दुष्परिणाम, खाजन शेतांचे उध्वस्तीकरण, आसमंतातील गावांमध्ये श्वसन विकार, प्रदूषित पाणीपुरवठ्यामुळे रोगराई, तक्रार केली तर खाणमालक, रखवालदार यांची दादागिरी असे पर्यावरण, शेती, फळबागा, जनआरोग्य व स्वास्थ याचे प्रचंड नुकसान होते. तरीही शासन खाणींना परवानगी देते. गोवा, कोकणामधून ही खनिजे स्वस्त किंमतीत चीनला निर्यात केली जातात. यामध्ये फायदा कोणाला होतो? चीनमधील उद्योग, भारतातील खाण मालक, ट्रक मालक, मजूर - कंत्राटदार, इतर मध्यस्त आणि परवाने देणारे शासकीय अधिकारी व मंत्रीसंत्री. यांत्रिकीकरणामुळे रोजगार मर्यादितच मिळतो. मजूर, हमाल आदी मुख्यतः राज्याबाहेरून पुरवले जातात, म्हणजे ते युनियन बांधत नाहीत.

तोटा कोणाचा होतो? खनिज संपत्तीचे साठे लाखो वर्षांच्या नैसर्गिक क्रिया-प्रक्रियांतून भूगर्भात निर्माण झालेले असल्याने ते वापरले की संपून जातात. तेव्हा त्यांचा वापर हा पुढील पिढ्यांचा विचार करून शास्त्रशुद्ध पद्धतीनेच केला पाहिजे. खनिजांची निर्यात अजिबात करता कामा नये. देशपातळीवर खनिजांचा वापर योजनाबद्ध पद्धतीने व काटेकोरपणे केला पाहिजे. कोकण व गोव्यामध्ये बॉक्साईट, लोह आदि नव्या खाणींना परवाने देता कामा नये. अस्तित्वातील खाणी कालबद्ध कार्यक्रम आखून पाच वर्षांत बंद केल्या पाहिजेत आणि खाणींमुळे झालेल्या पर्यावरण, बागा, शेती यांच्या नुकसानीची भरपाई खाणमालकांकडून करून घेतली पाहिजे. अशा रीतीने हिरव्याकंच निसर्गरम्य नंदनवनाचे वाळवटींकरण रोखले पाहिजे. या दृष्टीने रत्नागिरी - सिंधुदुर्ग जिल्ह्यातील असनिये,झोंबेळे, तलकट, कोळझर, शिरवळ, कळणे, कुंभवडे, भालाव, निवाळी, दाभिळ, ओतवणे, कोणशी, फुकेरी, धारपी, उडेली आदी गावातील ग्रामसभांनी आमचे क्षेत्र हे संवेदनशील परिसरक्षेत्र म्हणून घोषित करावा असे ठराव मंजूर केले आहेत.

**औष्णिक वीज प्रकल्प:** आयात इंधन आधारित वीजनिर्मिती प्रकल्प हाती घेण्याचे धोरण शासनाने स्वीकारल्याने कोकणवर मोठी धाड पडण्यास प्रारंभ झाला ती एन्रॉनच्या आगमनाने. रत्नागिरी जिल्ह्यात गुहागर तालुक्यात दाभोळ बंदराच्या दक्षिणेला अंजनवेल-कातळवाडी पठारावर एन्रॉनचा २१८४ मे०वॅ० क्षमतेचा आयात द्रवीभूत नैसर्गिक वायू या इंधनावर चालणारा वादग्रस्त एन्रॉन प्रकल्प १९९२ साली कोकणवर

लादण्यात आला. एन्रॉन ही उचापती अमेरिकन कंपनी २००१ डिसेंबरमध्ये बुडल्याने तो रत्नागिरी गॅस ऍण्ड पॉवर प्रा० लि०ने ताब्यात घेऊन २००६ साली कार्यान्वित केला. परंतु गॅसच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे रडतखडतच चालतो आहे. त्याची क्षमता ५००० मे०वॅ० पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव आहे. याशिवाय पुढील सुमारे २१००० मे०वॅ० क्षमतेचे आयात कोळसा आधारित वीजप्रकल्प कोकणवर लादण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

१) शहापूर - (रायगड जिल्हा) - रिलायन्स - ४००० मे०वॅ०, टाटा - ३००० मे०वॅ०

२) भोपण-(दापोली तालुका, रत्नागिरी जिल्हा)-जी.एम.आर. एनर्जी-१८०० मे. वॅ.

३) धोपावे-(गुहागर तालुका, रत्नागिरी जिल्हा)-एन.टी.पी.सी. - १६०० मे०वॅ०

४) जयगड-(रत्नागिरी तालुका)-जिंदाल-१२०० मे०वॅ० फेज१, ३२०० मे०वॅ० फेज२

५) रनपार-(गणेशगुळेच्या उत्तरेस, रत्नागिरी तालुका)-फिनोलेक्स - १००० मे०वॅ०

६) अल्ट्रामेगा प्रकल्प-मुणगे -(देवगड तालुका, सिंधुदुर्ग जिल्हा) - ४००० मे०वॅ०

७) धाकोरे-(सावंतवाडी तालुका, सिंधुदुर्ग जिल्हा) - १०५० मे०वॅ०

**अल्ट्रामेगा औष्णिक प्रकल्प:** सिंधुदुर्ग जिल्ह्यात गिर्ये-सौंदाळे येथे ४००० मे०वॅ० क्षमतेचा वीजनिर्मिती प्रकल्प प्रस्तावित होता. परंतु तेथील जनतेच्या तीव्र विरोधामुळे आचऱ्यानजीक मुणगे या गावाचा विचार चालू केला. पण तेथील जनतेचाही विरोध आहे कारण चार हजार मेगावॅट वीज निर्माण करण्यासाठी दररोज ४० हजार टन कोळसा वापरावा लागेल. त्यासाठी आयात कोळशाचे प्रचंड डोंगर प्रकल्पस्थळी साठवलेले असतील. कोळशाच्या पर्वतप्राय साठयांवरून उधळले जाणारे धुलीकण मैलोन् मैलाचा परिसर काळवंडून टाकतील; झाडे, प्राणी, माणसांना गुदमरवून टाकतील. कोळशाच्या अजस्र साठ्यामुळे प्रदूषित झालेले पाणी जांभ्या दगडातून मुरून, ओहळात शिरून परिसरातील पाण्याचे स्रोत दूषित होतील. आयात कोळसा वापरला तरी रोज सुमारे सात हजार टन राख तयार होईल. म्हणजे दरमहा दोन लाख टन राखेच्या साठ्यातून प्रदूषित पाणी जमिनीत मुरून आसमंतातील विहिरी, तळी, ओढे यांचे पाणी प्रदूषित होईल. उडती राख (fly ash) तर वाऱ्याबरोबर दूरवर पसरेल. परिणामी ४०-५० किलोमीटर परिसराला त्याचा धोका पोचेल.

वाफेच्या लोटांमुळे आर्द्रता वाढेल. रोज १ लाख टन कार्बन डायऑक्साईड हवेत सोडला जाईल व तो परिसरात साठून तापमान वाढेल. प्रदूषित वायूतील सल्फर डायऑक्साईडमुळे पाने पिवळी पडतील. पिके करपतील. हिवाळ्यात दव आणि सल्फर डायऑक्साईड एकत्र आल्याने ऍसिडचा शिडकावा पडेल. हाच मोहोर येण्याचा हंगाम असल्याने आंब्याची उत्पादकता व गुणवत्ता खालावेल. नायट्रोजन ऑक्साईडस्मुळे ओझोन व नायट्रेटस् तयार होतात. ओझोनमुळे पीक उत्पादन घटते. नायट्रेटमुळे पाण्यात शेवाळे (algae) फोफावून वनस्पतीतील विविधता कमी होते आणि मासे मारले जातात. याशिवाय सूक्ष्मकण (particulates), उडती राख आणि अरसेनिक, केडियम, क्रोमियम, पारा (mercury), डायऑक्सिन असे विषारी घटकही हवेत सोडले जातील. पारा पाण्यात मिसळून जिवाणू त्याचे विखारी मिथिल मरक्युरीमध्ये रूपांतर करतात. ते माशाच्या शरीरात साचून माणसाच्या सेवनात आल्यास घातक ठरते. अरसेनिक, पारा आदी विखारी घटक हवेतून व जमिनीतून पाण्यात मिसळून पिण्याचे पाणी दूषित बनते. भातखाचरांमध्ये अरसेनिक पोचले तर ते भाताच्या रोपांद्वारा तांदळातून मानवी सेवनात आल्यास कर्करोगाची बाधा होऊ शकते. पानावर साठलेली राख झाडाच्या प्रकाशसंश्लेषण कार्यात आणि आंब्याच्या मोहोरावर बसणारी राख परागीकरणाच्या कार्यात अडथळा आणेल. हिवाळ्यात धुक्यामुळे आंब्याच्या मोहरावर रोगांचा हल्ला होऊन उत्पादन घटेल. या महाकाय प्रकल्पातील सल्फर डायऑक्साईड, नायट्रोजन ऑक्साईडस्, कार्बन डायऑक्साईड आदी वायूंच्या प्रचंड उत्सर्जनामुळे आम्ल पावसाची बाधा परिसरातील जंगलसंपत्ती, शेते, बागा, किनाऱ्यावरील झाडेझुडपे यांना होऊन उत्पादन घटेल, माती दूषित झाल्यानेही उत्पादन कमी होईल व पाणी दूषित होईल.

४००० मे०वॅ० क्षमतेच्या औष्णिक प्रकल्पासाठी समुद्रातून दररोज चाळीस कोटी लिटर पाणी खेचले जाईल व गरम सांडपाणी समुद्रात फेकले जाईल. हे पाणी खाडीचे मुख व किनारपट्टीवर पसरेल. शिवाय हे प्रकल्प आयात कोळशावर अवलंबून असल्याने मोठी मालवाहू जहाजे व अन्य सागरी वर्दळ वाढून समुद्रात तेल व वगंणाचे प्रमाण वाढेल. किनारपट्टी व खाड्या येथील खारफुटी व इतर वनस्पतीसंपदा नष्ट केली जाऊन किनाऱ्याचे संरक्षण नाहीसे होईल. तसेच मासे व इतर जलचर यांच्या प्रजननाच्या जागा नष्ट होऊन ही सागरी संपत्ती धोक्यात येईल. त्यावर अवलंबून असलेल्या मच्छीमारांच्या निर्वाहावर गदा येईल. अशा या

विनाशकारी औष्णिक प्रकल्पाच्या विरोधात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जनतेने प्रखर आंदोलन छेडून हा प्रकल्प रोखून धरला आहे. मुंबई येथेही देवगड तालुका विकास आणि संघर्ष समिती प्रकल्पाविरोधात क्रियाशील आहे.

कोळसा आधारित औष्णिक वीज प्रकल्पामुळे प्रदूषणाच्या विळख्यात सापडलेल्या जनतेच्या आरोग्यावर हवेतून श्वसनाद्वारे, त्वचेतून, पाण्यातून व मासे आदी खाद्यातून, प्रदूषणाचे घातक परिणाम घडतात. प्रदूषणाची मात्रा, वारंवारिता, व्यक्तीची प्रकृती, वय अशा विविध घटकांवर बाधा होण्याची संभाव्यता अवलंबून असते. माणसांप्रमाणेच पाळीव जनावरे, जंगली प्राणी, पक्षी, मासे या सर्वांना प्रदूषणाची बाधा संभवते. परिणामी प्राणी, पक्षी व वनस्पती संपत्ती यातील नैसर्गिक विविधता धोक्यात येते.

**जैतापूर आण्विक वीजप्रकल्प:** न्यूक्लियर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडियामार्फत रत्नागिरी जिल्ह्यात राजापूर तालुक्यात माडबनच्या पठारावर जैतापूर अणुऊर्जा प्रकल्प उभारण्याचे ठरवण्यात आले आहे. तेथे १६५० मेगावॅट क्षमतेच्या ६ अणुभट्टया म्हणजे एकूण ९९०० मे०वॅ० क्षमता उभारण्याची योजना आहे. २००६ साली प्रकल्पासाठी जमीन संपादनांच्या नोटीसा निघाल्यापासून तेथील जनता चिकाटीने प्रकल्प विरोधात लढत आहे.

अणुऊर्जा प्रकल्पाची घातकताः अणुभंजनाच्या क्रियेतून किरणोत्सारी द्रव्ये प्राप्त होतात. किरणोत्साराचे वैशिष्टय म्हणजे तो दिसत नाही, त्याला वास नाही, मात्रा माफक असल्यास लगोलग त्याचा परिणाम जाणवत नसल्याने त्याची बाधा झाल्याचे कळत नाही. अणुभट्टीतून वातावरणात सोडली जाणारी वाफ व वायू आणि पाणी यातून परिसरातील नागरिक व मासे, प्राणी, वनस्पती यांना किरणोत्साराची बाधा होण्याचा धोका असतो. किरणोत्सारामुळे गाठी, कर्करोग, वंध्यत्व, गर्भपात, मृत अर्भके, जन्मजात व्यंग याचा धोका संभवतो. राजस्थानमधील अणुभट्टी परिसरातील अभ्यासामध्ये या समस्या आढळल्या आहेत. विशेष गंभीर बाब म्हणजे पुढील पिढ्यांमध्येही हे घातक परिणाम उद्भवण्याची शक्यता असते. काही किरणोत्सारी द्रव्यांची घातकता लाखो वर्षे कायम राहाते. किरणोत्सारी ऱ्हास प्रक्रियेत प्रचंड उष्णता निर्माण होते. त्यामुळे हा अणुकचरा सुरक्षितपणे बंदिस्त ठेवणे व त्यांची कायमची सुरक्षा व्यवस्था करणे, हा आण्विक वीजनिर्मिती प्रकल्पातला सर्वात जटिल प्रश्न आहे.

**अयोग्य प्रकल्प स्थान:** अणुऊर्जा प्रकल्पाचे स्थान निवडताना विविध निकषांचा विचार केला जातो. त्यातील एक महत्त्वाचा निकष म्हणजे भूकंपप्रवणता. त्यासाठी किमान भूकंपप्रवणता असलेले क्षेत्र १ व २ निवडले जाते. कारण मोठा भूकंप होऊन अपघात झाला तर किरणोत्सारामुळे हाहाःकार उडेल. जैतापूर परिसर हा भूकंपप्रवणतेवर क्षेत्र ४ मध्ये येतो. कोयना परिसरात व रत्नागिरी जिल्ह्यात भूकंपाचे शेकडो धक्के सातत्याने बसत आहेत. ९९०० मे०वॅ० क्षमतेच्या अणुऊर्जा केंद्रासाठी दररोज लाखो टन पाणी समुद्रातून उचलले जाईल व गरम पाणी समुद्रात सोडले जाईल. त्यामुळे कालवे, कोळंबी व मत्स्यसंपत्तीवर घातक परिणाम होतील. म्हणून या क्षेत्राची निवड करणे हे अशास्त्रीय व घातक आहे.

अणुभट्टयांची घातकता व खर्चिकता या कारणांमुळे बहुतेक पाश्चिमात्य देश आज नवीन प्रकल्प उभारत नाहीतच. ११ मार्च २०११ रोजी जपानमधील फुकुशिमा आण्विक प्रलयानंतर तर अनेक देश चालू अणुभट्टयाही क्रमशः बंद करून शाश्वत ऊर्जा स्रोतांकडे वळत आहेत. भारतीय शासन मात्र 'सौदेबाजी' करून अमेरिका, फ्रान्स आदी देशातील बड्या कंपन्यांच्या अणुभट्टया निमंत्रित करत आहे आणि हे महाकाय अणुवीज प्रकल्प जुलूम जबरदस्तीने जनतेवर लादत आहे.

**दुर्मिळ वनस्पती संपन्न सडा:** माडबन पठाराचे खास वैशिष्ट्य म्हणजे झाडांवर वाढणारी आणि खास पश्चिम घाटातली अनेक आमरी अथवा ऑर्किड भरपूर पावसाच्या दाट अरण्यांत फोफावतात, तर श्रावण आमरी, भाद्रपद आमरींसारखी जमिनीत वाढणारी ऑर्किड माडबनसारख्या सड्यांवर बहरतात. हे सडे - ही पठारे महाराष्ट्र - गोव्यातील सह्याद्रीचा एक खासा ठेवा आहेत. ती इकडे तिकडे विखुरलेली आहेत, त्यामुळे लक्षावधी वर्षे ह्यांवरील वनस्पतिगणांची उत्क्रान्ती आपापल्या चालीने होत आली आहे. सह्याद्रीचे हे रानफुलांनी रंगणारे सडे अगदी मर्यादित टापूत सापडणाऱ्या व दुर्मीळ वनस्पतींचे भांडार बनले आहेत. ह्या अगदी वेगळ्या धर्तीच्या वनस्पतींखेरीज इथल्या पावसाळी डबक्यांत देवभातासारखे भाताचे वन्य भाईबंदही आढळतात. भारतात दुसरीकडे कुठेच इतक्या छोट्या टापूंत इतक्या विविध, दुर्मीळ वनस्पति प्रजाती आढळत नाहीत. ही निसर्गसंपदा लोकांच्या परिचयाची आहे. बाहेरून चार दिवस येणाऱ्या शासनाच्या भाडोत्री तज्ज्ञांनी ह्या सड्यांवर कुसळी गवतांखेरीज काही नाही असे अहवाल सादर केले आहेत. अशी चुकीच्या माहितीवर आधारलेली परीक्षणे मान्य करून दिल्लीच्या तख्तावर बसलेल्या मंत्र्यांनी व तज्ज्ञ बाबूंनी इथे अणुवीज प्रकल्प मंजूर केले आहेत.

**<u>मोंड्यावरील जैवविविधता:</u>** पश्चिम घाटावरच्या जैवविविधतेत जलचरांचेही मोठे योगदान आहे. भारतखंड दक्षिण गोलार्धातील गोंडवनलॅंडचा भाग असतानाच इथले गोड्या पाण्यातले मासेही अवतरले होते. म्हणून पश्चिम घाटावरच्या २१८ गोड्या पाण्यातील माशांच्या प्रजातींपैकी ११६ केवळ इथेच आढळतात. अनेकदा ते किती महत्त्वाचे आहेत हे कुणाच्या हिशेबीही नसते. एकच उदाहरण घेऊ या, जिथे सरिता मिळती सागरा तिथल्या चिखलाट टापू अथवा मोड्यांचे. इथे कालवे - तिसऱ्या - मुळे - वाकुंडे - शिंदाणे असे विविध शिंपले फोफावतात. नुकताच कारवार जिल्ह्यातल्या अघनाशिनी नदीच्या अजून सुस्थितीत असलेल्या खाडीचा सुभाषचंद्रन् आणि भूमिनाथन् ह्या शास्त्रज्ञांनी काळजीपूर्वक अभ्यास केला आणि दाखवून दिले की तिथल्या मोड्यावरच्या शिंपल्यांच्या वार्षिक उत्पादनाचे मोल आहे साडे पाच कोटी रुपये. आता कर्नाटक शासनाने ह्या प्रदेशाला निसर्गाचा ठेवा म्हणून कायमचे राखून ठेवायचे ठरवले आहे, तिथला औष्णिक विद्युतप्रकल्प रद्द करून. कोकणच्या किनारपट्टीवर असे अनेक चिखलाट टापू आहेत. जैतापूर अणुवीज प्रकल्प, औष्णिक वीज प्रकल्प, सागरी महामार्ग, पुळणीवर हॉटेल्स, जलक्रीडा प्रकल्प यामुळे ते उद्ध्वस्त होण्याचा धोका आहे.

**<u>पवनचक्क्या:</u>** प्रदूषणविरहित म्हणून पवनचक्क्या प्रकल्पांना शासन उत्तेजन देत आहे. पण त्यामुळे होणाऱ्या डोंगरदऱ्यांच्या व जैवविविधतेच्या उद्ध्वस्तीकरणाकडे दुर्लक्ष केल्याने मोठे नुकसान होत आहे. उदा० भीमाशंकर परिसर शेकरू या राज्यपशूसाठी प्रसिद्ध आहे. इथे २००८ साली पवनचक्क्या उभारण्याचा एक प्रस्ताव मांडण्यात आला. ह्याबाबत तिथल्या फॉरेस्ट रेंजरने प्रामाणिकपणे अहवाल देताना खालील मुद्दे मांडले: १) हा चाकण वनक्षेत्रातील सदाहरित वनाच्छादित टापू आहे. २) भीमाशंकर अभयारण्याजवळील ह्या वनांमुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होते, ३) पवनचक्क्या आल्यास वन्य प्राण्यांचे आश्रयस्थान व आढळ ह्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. येथे दुर्मिळ शेकरू खार, लांडगा, कोल्हा, तरस, मोर, बिबट्या आढळतात. ४) प्रकल्पांतर्गत रस्त्यांमुळे पर्यटकांची ये जा वाढल्यास सदाहरित जंगलास हानी पोचण्याची शक्यता आहे. हा अहवाल ताबडतोब दडपण्यात आला व वनखात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी इथे सदाहरित वन नाही, काहीही महत्त्वाचे वन्य जीव नाहीत असे खोटे-नाटे निवेदन करत पवनचक्क्यांना परवानगी दिली. जो वनविभाग महाबळेश्वरला संरक्षित क्षेत्राच्या सबबीवर असहाय्य खेडुतांच्या गावांचे दळण-वळण तोडत आहे, तोच वनविभाग इथे पवनचक्क्यांसाठी घनदाट राखीव जंगल बेधडक तोडून रस्ते बनवून देतोय! ह्या पवनचक्क्यांसाठी निष्काळजीपणे बांधलेल्या रस्त्यांनी दरडी कोसळताहेत, गाळाने ओढे, नदी-नाले-धरणे भरताहेत, शेतीची नासाडी होते आहे. वारा कमी-जास्त वेगाने वाहत असल्याने विशिष्ट स्थळीच पवनचक्क्यां उभारणे शक्य होते. त्यासाठी केवढी मोठी किंमत मोजली जाते आहे हे भीमाशंकर, सातारा ते कोयना दरम्यानची जैवविविधता संपन्न पठारे आदी ठिकाणाच्या अनुभवावरून दिसून आले आहे. तेव्हा याबाबत काळजीपूर्वक निर्णय घेणे अगत्याचे आहे.

**<u>प्रदूषणकारी उद्योग:</u>** कारखानदारीमुळे प्रदूषणाची बाधा परिसरात होऊ नये यासाठी कायदेशीर तरतुदी आहेत. पण भरमसाठ नफा मिळत रहावा म्हणून पर्यावरण संरक्षणाचे सगळे कायदे पण खुंटीला टांगून ठेवले जातात. उदा. चिपळूण जवळील लोट्याच्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामधील (एम०आय०डी०सी०) रासायनिक कारखान्यांतून निर्माण होणाऱ्या हवेच्या व पाण्याच्या भयंकर प्रदूषणावर व्यवस्थित व पुरेशी कारवाई होत नाही, आणि जी उपाययोजना राबवली जाते ती दोषपूर्ण आहे. दूषित पाण्याचा विसर्ग ओढ्यात जातो. याच ओढ्याचे पाणी कोतवली गाव पिण्यासाठी वापरते. परंतु कोतवलीच्या पाण्याच्या प्रदूषणावर कोणतीही परिणामकारक उपाययोजना करण्यात आलेली नाही. असेच विषारी सांडपाणी टॅंकरमध्ये भरून घेऊन बोरज धरणामध्ये टाकले गेले. याच बोरज धरणातून साऱ्या खेड शहराला पाणी पुरवठा होतो. ह्या अघोरी प्रकारामुळे खेडला होणारा पाणीपुरवठा काही काळ बंद ठेवावा लागला. लोटे येथील अनेक रासायनिक उद्योग त्यांचे विषारी सांडपाणी बोअरवेल खणून भूजलात सोडताहेत. अशा कित्येक अपराधांची नोंद आहे, पण कारवाई केलेली नाही. लोटेमधील रासायनिक प्रदूषणामुळे दाभोळ खाडीतील माश्यांची संख्या घटते आहे. स्थानिक लोकांच्या निवेदनानुसार इथल्या मत्स्य उद्योगातील २० हजार लोक बेकार झाले आहेत. उलट रासायनिक उद्यमांत केवळ ११ हजार नवे रोजगार उपलब्ध झाले आहेत.

**<u>पर्यटन:</u>** पर्यटनामुळे रोजगार वाढेल असा भरवसा असतो; परंतु हे पर्यटन कोणत्या प्रकारचे आहे यावर त्यामधून रोजगार कशा प्रकारे वाढेल आणि पर्यावरणाला किती धोका पोचेल हे अवलंबून असते. पंचतारांकित पर्यटन हे श्रीमंत थरासाठी असल्याने त्यांच्या सरबराईसाठी उंची दारू, डबाबंद मांस, मेवा, साबण, अत्तरी फवारे हे सर्व बाहेरूनच आणले जाते. अनुभवी खानसामे, सेवकही बाहेरचेच. कोकणवासीयांना अंगमेहनतीची गडी, माळी, मोलकरीण, चपराशी यापलीकडे कामे मिळणे कठीण. विलासी पर्यटकांबाबत गोव्यातला अनुभव आहे की कोवळ्या वयाची मुले, मुली, स्त्रिया यांना लैंगिक व्यवसायामध्ये ओढले जाते. श्रीमंत पर्यटन व्यवसायामध्ये पूर्वी जसे राजेरजवाडे, राजपुत्र यांच्या सेवेसाठी दास-दासी गुलामासारखे वापरले जात, तेच

नाते पर्यटक व सेवकांमध्ये असते. पर्यटक चैनी, अरेरावी, कधी दारू, अमली पदार्थांच्या धुंदीत तर चाकर नम्रपणे त्यांच्या हुकमाच्या तालावर नाचवले जातात! हे नाते पर्यटक व सेवक दोहोंच्याही दृष्टीने घातक, अमानवी असते. शिवाय लैंगिक अत्याचाराचा धोका वेगळाच. अशा रीतीने जेव्हा पंचतारांकित पर्यटनाला शासन उत्तेजन देते तेव्हा त्याचे कोकणातील श्रमिकांवर, संस्कृतीवर काय दुष्परिणाम होतील आणि म्हणून अशा तऱ्हेच्या रोजगाराचे स्वागत करायचे का याचा गंभीर विचार होणे अगत्याचे आहे. शिवाय पुळणी, डोंगरमाथे, पठारे येथील पर्यटन व्यवसाय किंवा धनिकांचे बंगले आणि लवासासारखी हिल स्टेशन यांच्या उभारणीमुळे जंगले, पाण्याचे स्रोत, सरोवरे, पक्षी, प्राणी यांचा विनाश, प्रदूषणाचे प्रश्न आणि श्रमिकांचे विस्थापन आदी समस्या उद्भवतात. तेव्हा सह्यपर्वतराजी व रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्हे येथे धनिककेंद्री निवास व पर्यटन यास मुभा देता कामा नये. दुसऱ्या प्रकारचे पर्यटन म्हणजे कृषी पर्यटन आणि शैक्षणिक सहली. शाळा, महाविद्यालयातील माफक उत्पन्नवर्गीय विद्यार्थी, विद्यार्थिनी यांची सुट्टी-सहलीसाठी कोकणवारी. या पर्यटकांचा मुक्काम राहुट्या, देवालये, धर्मशाळा किंवा घरोघरी आणि यजमानांशी नाते अतिथी म्हणून अगत्याचे-बरोबरीचे. सह्याद्री व कोकणातील पर्यटन विकास हा पर्यावरणास धक्का न पोचवता केवळ पैदल मनमुराद भ्रमण, निसर्गनिरीक्षण, निसर्ग-सौंदर्यास्वाद व शैक्षणिक सहलींना पोषक सोयी-सुविधा पुरवण्याच्या दृष्टीने केला पाहिजे. अशा सहलींत श्रमसहभागाचा वाटा उचलण्याचे आयोजन करता आले तर शेतकऱ्यांना मदतकारक होईल आणि विद्यार्थी-विद्यार्थ्यांना आगळा आरोग्यदायी अनुभव मिळेल.

**बंदरे:** कोकणामधील खनिजाची निर्यात बंद केल्यावर आणि तेथे आयात कोळसा / द्रवीभूत गॅस आधारित वीजनिर्मिती केंद्रे उभारण्यास मनाई केल्यावर तेथे मोठ्या जहाजांची वाहतूक करण्याची सुविधा विकसित करण्याचे कारण नाही. तेव्हा खाजगीकरणातून बंदर विकासाचे सर्व प्रस्ताव रद्द केले पाहिजेत. मच्छिमारी व मासे, आंबे निर्यातीसाठी आवश्यक तेवढ्या सागरी वाहतूक सुविधा सार्वजनिक क्षेत्रातून विकसित केल्या पाहिजेत.

**विमानतळ:** कोकणमध्ये पंचतारांकित पर्यटन आणि विमानतळाचा प्रस्ताव आहे. परंतु पंचतारांकित पर्यटनास परवानगी देणे हानिकारक असल्याने त्यावर बंदी घातल्यावर विमानतळाची काही गरज नाही. गोवा व मुंबई येथे विमानतळ आहेतच. विमानतळासाठी फार मोठी सपाट जागा लागत असल्याने, मोठ्या प्रमाणात विस्थापन व डोंगर, दऱ्या, जंगले, जैवविविधता यांचे उद्ध्वस्तीकरण होते. म्हणूनच रेवस - मांडवा विमानतळाला जनतेने विरोध केला.

**लोकहितविरोधी विकासरीती:** आज विकासाची व्याख्या केवळ आर्थिक निकषावर केली जाते आणि त्याचे मोजमाप केले जाते ते वस्तू-सेवा निर्मितीची पट्टी लावून पैशाच्या रूपात. राष्ट्रीय उत्पन्नाचा दर ८ टक्के-९ टक्के म्हणजे विकासाची दौड मानली जाते. ही उत्पादन वाढ साधताना पुनर्निर्मितीक्षम नसलेली खनिजसंपत्ती संपवणे, पर्यावरणाचा विनाश, प्रदूषणाचा त्रास हा खर्च विचारात घेतला जात नाही. तो लक्षात घेतला तर शासन लादत असलेले कोणतेच प्रकल्प फायदेशीर दिसणार नाहीत. शिवाय या वाढत्या उत्पन्नाचे विभाजन कसे होते आहे? तर ते महापद्मधीश (लाख-कोटी), कोट्यधीश यांच्या हातात वाढत्या प्रमाणात केंद्रित होते आहे. किमान जीवनमान गाठण्यासाठी आवश्यक तेवढे उत्पन्न कष्टकरी जनतेच्या हातात पोचत नाही. श्रीमंतीचे वाढते केंद्रीकरण होत असल्याने उत्पादनाचे अग्रक्रमही त्यानुसार ठरत आहेत. उत्पादनामध्ये शस्त्रास्त्रे, चैनीच्या वस्तू, फालतू-घातक वस्तू यांचे प्रमाण वाढते आहे आणि धान्य, तेल, डाळी, घरे आदी जीवनावश्यक वस्तूंची तूट पडून महागाई वाढून श्रमिकांची ससेहोलपट वाढते आहे. एवढेच नव्हे तर प्रचलित "विकासा"साठी सेझ, विमानतळ, खाणी, कारखाने, इ० उभारण्यासाठी जमीन, जंगलसंपत्ती, मत्स्यसंपत्ती अशी श्रमिकांची जगण्याची साधने हिरावून घेतली जात आहेत. आणि लाखो श्रमिकांना देशोधडीला लावले जात आहे. जमिनीवरून, जंगलातून सक्तीने उचलबांगडीस शेतकरी-आदिवासी विरोध करीत आहेत. तेव्हा पोलीस-जुलूमजबरदस्ती-शस्त्रबळाचा वापर करून "विकासा"चा बुलडोझर शासन रेटत आहे. कारण राज्यकर्त्यावर्गास-मंत्री-खासदार-आमदार, नोकरशाही, बडे उद्योगपती, व्यापारी, बडे जमीनमालक, बिल्डर, त्यांचे हस्तक व आश्रित, यांना त्यातून फायदा लाटता येतो.

**विकासाचा भूलभूलय्या:** विकासाच्या नावाखाली चाललेल्या झगमगाटाच्या भूलभूल्लय्याने न फसता त्याचे खरे स्वरूप समजून घेतले पाहिजे. नव्या उद्योगांमुळे रोजगार निर्मिती फारशी होत नाही. एवढेच नाही तर त्या ऊर्जा प्रधान उद्योगांमुळे वीज निर्मिती, खाणींची गरज वाढून मोठ्या प्रमाणात भारतातील जंगले व अन्य निसर्गसंपत्तीचे उद्ध्वस्तीकरण होत आहे आणि श्रमिकांची जमीन-पाणी-जंगल ही निर्वाह साधने हडप केली जात आहेत. प्रचलित आर्थिक वाढ ही अशी श्रमिक विरोधी व देशविघातक आहे. प्रचलित विकासरीती ही केवळ भांडवलप्रधान आहे असे नव्हे तर ती विकासाचे एक घातक मूल्य, एक अनिष्ट 'आदर्श' समाजात रुजवत असते. 'खाजगी नफा' आणि उत्पादनांच्या राशी म्हणजेच विकास. विकासाचा एकमेव मार्ग म्हणजे

बाजारयंत्रणा, ती काबीज करण्यासाठी मन बधीर करून टाकणारी आक्रमक जाहिरातबाजी, "सततचा उपभोग म्हणजेच सुख" या भ्रमावर स्वार होऊन चाललेली दौड म्हणजे विकास असा भ्रम निर्माण केला जात आहे. सट्टेबाजी, वित्तव्यवहारामार्फत भांडवलाची हाताळणी, जीवघेणी स्पर्धा, निसर्गाचा ऱ्हास, कचऱ्याचे ढीग, प्रचंड प्रदूषण, शोषण या रूपात समाजावर मोठी किंमत लादून खाजगी नफ्याचे केंद्रीकरण करणारी ही विकासपद्धती माणसाचे माणूसपण मारून "पैसा" हे दैवत बनवते. पैशासाठी कोणतेही मार्ग वापरणे नैतिकच(!) मानते. झटपट पैशाच्या मागे असलेले मध्यस्थ, दलाल, त्यांचे हस्तक असे उपरे स्तर वाढवले जात आहेत. आक्रमक व्यक्तिवाद व पराकोटीचा स्वार्थ बोकाळून भ्रष्टाचार, गुन्हेगारी, व्यसनाधीनता याला समाजमान्यता प्राप्त होते आहे. आर्थिक अंगाने जसा भणंग वर्ग वाढत आहे तसा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अंगानेही तो पोसला जात आहे.

विकासाचा हा शासकीय बुलडोझर महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक व केरळ राज्यातील पश्चिम घाट पर्वतश्रेणी आणि कोकणमधील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हे येथील पर्यावरण व जैवविविधता कसा उद्ध्वस्त करीत आहे याचे प्रत्यक्ष अनुभवांआधारे गाडगीळ समितीने विश्लेषण केले. त्यातील महाराष्ट्रातील - मुख्यतः कोकणमधील समस्यांचा येथवर आढावा घेतला. त्यावरून या संवेदनशील प्रदेशाचे रक्षण करण्यासाठी कोकणवासीय अटीतटीने का झगडत आहेत हे स्पष्ट होते.

या विविध जनआंदोलकांनी एकत्र येणे आणि प्रत्यक्ष प्रकल्पाची झळ पोचत नसली तरी या व्यापक प्रश्नाचे महत्त्व लक्षात घेऊन या प्रश्नी व्यापक जनजागृती मोहीम आणि जनचळवळ उभी राहणे गरजेचे आहे. यासाठी विविध विद्यार्थी संघटना, स्त्री संघटना, कामगार, शेतकरी-शेतमजूर संघटना, वीज, बँक, राज्य कर्मचारी संघटना आदींनी एन्रॉन प्रकल्पविरोधी राज्यव्यापी समिती संघटित करून एकसंघपणे, चिकाटीने प्रश्न लावून धरला, त्या पद्धतीचे व्यापक जनसंघटन उभे करणे ही काळाची गरज आहे.